


दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक BII/RNP/SRP/25/2023-25




अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक २२८ । किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | शनिवार १९ /०९/२०२६ । पाने - ६




# महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सच्या विशेष निमंत्रित सदस्यपदी गिरीश मालपाणी, प्रकाश कलंत्री, आनंद हासे यांची निवड


गिरीशजी मालपाणी


प्रकाश कलंत्री


आनंद हासे

## अहिल्यानगरच्या उद्योगविश्वाचा राज्यस्तरीय गौरव

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्रातील उद्योग, व्यापार, कृषी आणि सेवा क्षेत्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स, इंडस्ट्री अँड ग्रिकल्चर (MACCIA) च्या गव्हर्निंग कौन्सिलमध्ये संगमनेरचे उद्योजक गिरीश मालपाणी, प्रकाश कलंत्री आणि आनंद हासे यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून निवड झाली आहे. या निवडीमुळे अहिल्यानगरच्या उद्योग व व्यापारी क्षेत्राला राज्यस्तरीय व्यासपीठावर प्रभावी प्रतिनिधित्व मिळाले असून, जिल्ह्याच्या औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्राच्या दृष्टीने ही महत्त्वपूर्ण बाब मानली जात आहे.

गिरीश मालपाणी हे मालपाणी उद्योग समूहाचे संचालक असून उद्योग क्षेत्रासोबतच सामाजिक आणि सेवाभावी कार्यातही त्यांचा सक्रिय सहभाग आहे. ते लायन्स क्लबच्या मल्टिपल कौन्सिलचे चेअरपर्सन म्हणूनही कार्यरत आहेत. त्यांच्या अनुभवाचा मोठा फायदा संस्थेला होणार आहे.

प्रकाश कलंत्री हे संगमनेर व्यापारी असोसिएशनचे माजी अध्यक्ष असून संगमनेरच्या व्यापारी क्षेत्रातील अनुभवी उद्योजक म्हणून त्यांची ओळख आहे. व्यापारी वर्गाचे प्रश्न, स्थानिक व्यापारविषयक विषय आणि उद्योग क्षेत्राशी संबंधित विविध उपक्रमांमध्ये त्यांनी सक्रिय सहभाग घेतला आहे.

आनंद हासे हे रोटरी डिस्ट्रिक्ट ३१३२ चे असिस्टंट गव्हर्नर, युवा पॉलिप्रिंट अँड पॅकेजिंग इंडस्ट्रीजचे संचालक तसेच दैनिक युवावार्ताचे संचालक आहेत. उद्योग, पॅकेजिंग, मीडिया आणि सामाजिक क्षेत्रात कार्यरत असलेल्या आनंद हासे यांच्या विविधांगी अनुभवाची दखल घेण्यात आली आहे. महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्सचे अध्यक्ष रविंद्र माणगावे यांनी निवडीचे पत्र या तीनही सदस्यांना पाठविले आहे.

यापूर्वी उद्योजक श्रीनिवास भंडारी आणि गोरख कुटे यांची MACCIAच्या गव्हर्निंग कौन्सिल सदस्यपदी बिनविरोध निवड झाली आहे. आता गिरीश मालपाणी, प्रकाश कलंत्री आणि आनंद हासे यांची विशेष निमंत्रित सदस्य म्हणून झालेली निवड ही संगमनेरबरोबरच अहिल्यानगरच्या उद्योग व व्यापारी क्षेत्राच्या दृष्टीने विशेष उल्लेखनीय ठरली आहे. या निवडीमुळे जिल्ह्यातील उद्योजक, व्यापारी, चड्चए आणि उद्योग क्षेत्राशी संबंधित प्रश्नांना राज्यस्तरीय व्यासपीठावर मांडण्यासाठी अधिक व्यापक संधी उपलब्ध झाली आहे. यापूर्वी संगमनेरच्या साई सम्राट बॅटरीचे संचालक निलेश चव्हाण, भंडारी अग्रोचे संचालक पियुष भंडारी आणि सुप्रिम पॅकेजिंगचे संचालक संजय दिघे यांनी संस्थेमध्ये विशेष योगदान दिले.

MACCIA ची स्थापना १९२७ मध्ये दूरदृष्टीचे उद्योगपती स्व. शेठ वालचंद हिराचंद यांच्या पुढाकारातून झाली. जवळपास शतकभराच्या वाटचालीत संस्थेने उद्योग आणि शासन यांच्यातील महत्त्वाचा दुवा म्हणून कार्य करत महाराष्ट्राच्या आर्थिक व औद्योगिक विकासात योगदान दिले आहे. संस्थेच्या माध्यमातून शासनासमवेत उद्योगांविषयी धोरणात्मक पाठपुरावा, व्यावसायिक नेटवर्किंग, प्रशिक्षण व क्षमता विकास, मध्यस्थी व विवाद निराकरण तसेच चड्चए, उत्पादन, कृषी आणि निर्यात क्षेत्राला सहाय्य अशा विविध उपक्रमांद्वारे उद्योगविश्वाला व्यासपीठ उपलब्ध करून दिले जाते. MACCIA च्या अधिकृत माहितीनुसार, संस्थेचे महाराष्ट्रभर व्यापक जाळे असून विविध उद्योग, व्यापारी, कृषी क्षेत्रातील घटक आणि व्यावसायिकांना एकत्र आणण्याचे कार्य संस्था करते. उद्योग, व्यापार आणि सामाजिक क्षेत्रातील तीन अनुभवी व्यक्तींना महाराष्ट्राच्या अग्रगण्य उद्योग संस्थेच्या गव्हर्निंग कौन्सिलमध्ये स्थान मिळाल्याबद्दल सर्व स्तरांतून त्यांचे अभिनंदन होत आहे.

# दुष्काळात थातूरमातूर नाही तर ठोस मदत देणार - मंत्री बावनकुळे



मुंबई (वृत्तसंस्था)

राज्यात दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकऱ्यांना थातूरमातूर मदत न करता भविष्यात भक्कम आधार मिळेल अशी सर्वंकष उपाययोजना राज्य सरकार करणार असल्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी स्पष्ट केले आहे. नागपूर येथे पत्रकारांशी संवाद साधताना त्यांनी स्पष्ट केले की, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीत दुष्काळाच्या विषयाला सर्वोच्च प्राधान्य दिले असून, प्रशासनाला थेट बांधावर उतरण्याचे आदेश दिले आहेत. पुढील ७ ते ८ दिवसांत दुष्काळाचा सविस्तर अहवाल येईल आणि त्या आधारे केंद्र व राज्य सरकारकडून मदतीचा ठोस निर्णय घेतला जाईल. याशिवाय 'महाखनिज २.०' धोरण, शक्तिपीठ महामार्ग, आजारी बालिकेचा उपचार आणि राजकीय घडामोडींवर त्यांनी सविस्तर भाष्य केले.

शरद पवार यांनी मुख्यमंत्र्यांना लिहिलेल्या पत्राबाबत बोलताना बावनकुळे म्हणाले, दुष्काळाच्या मुद्द्यावर कोणीही राजकारण करण्याची गरज नाही. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस अत्यंत संवेदनशील असून, मंत्रिमंडळाच्या बैठकीत सर्व विषय बाजूला ठेवून त्यांनी दुष्काळाला 'टॉप प्रायॉरिटी' दिली आहे. महसूल, कृषी, मदत व पुनर्वसन विभागासह सर्व जिल्हाधिकाऱ्यांना तातडीने कामाला लावले आहे. १८ जिल्ह्यांचा प्राथमिक अहवाल प्राप्त झाला असला तरी केवळ त्या आधारे निर्णय घेता येत नाही. सोयाबीन, कापूस, संत्रा आदी पिकांचे नेमके किती नुकसान झाले, याचा अंतिम अहवाल पुढील मंगळवार-बुधवारपर्यंत म्हणजेच ७ ते ८ दिवसांत येईल. २०१७ किंवा २०१८ च्या शासन निर्णयांच्या धर्तीवर शेतकऱ्यांना दिलासा दिला जाईल.

# घुलेवाडी उपजिल्हा रुग्णालयाचे काम मार्चपर्यंत पूर्ण करा

## आ. अमोल खताळांचा ठेकेदाराला इशारा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- संगमनेर शहरालगत असलेल्या घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाचे शंभर खाटांच्या उपजिल्हा रुग्णालयात रूपांतर करण्यात आले आहे. मात्र उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे बांधकाम संबंधित ठेकेदाराच्या मर्जीप्रमाणे आणि अत्यंत धीम्या गतीने सुरू आहे. या कामाला गती देऊन मार्च महिन्यापर्यंत बांधकाम पूर्ण झाले पाहिजे. अन्यथा संबंधित ठेकेदाराकडून काम काढून घेऊन नवीन ठेकेदाराची नियुक्ती करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा आमदार अमोल खताळ यांनी दिला.

घुलेवाडी ग्रामीण रुग्णालयाच्या सनियंत्रण व सल्लागार समितीची बैठक आमदार खताळ यांच्या प्रमुख उपस्थितीत झाली. यावेळी ते बोलत होते. बैठकीस जिल्हा रुग्णालयाचे निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ. शिवशंकर वलांडे, ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक तथा समितीचे सचिव डॉ. राजकुमार जऱ्हाड, गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, नगरसेविका साक्षी सूर्यवंशी, विनायक वाडेकर, शहरप्रमुख विनोद सूर्यवंशी, युवा सेना शहरप्रमुख सौरभ देशमुख आदी उपस्थित होते.

**संगमनेर शहरातील धर्मादाय विभागाच्या यादीत असलेल्या आणि धर्मादाय रुग्णालय म्हणून सेवा देणाऱ्या रुग्णालयांनी त्यांच्या रुग्णालयाबाहेर 'धर्मादाय रुग्णालय' असा स्पष्ट फलक लावावा. याबाबत वैद्यकीय अधिकाऱ्यांनी संबंधित रुग्णालयांना तातडीने सूचना द्याव्यात. पंधरा दिवसांच्या आत फलक लावण्यात आला आहे की नाही, याची पाहणी करून अहवाल सादर करावा. तसेच ग्रामीण भागात वैद्यकीय शिबिरे आयोजित करावीत. ग्रामीण रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना कोणताही त्रास होणार नाही, याची काळजी वैद्यकीय यंत्रणेने घ्यावी.**

**आ. अमोल खताळ, संगमनेर**

आमदार खताळ म्हणाले, उपजिल्हा रुग्णालयाच्या इमारतीचे दर्जेदार व वेळेत बांधकाम पूर्ण करून घेण्याची सर्वस्वी जबाबदारी वैद्यकीय अधीक्षक म्हणून तुमची आहे. बांधकामाची गुणवत्ता आणि वेग याबाबत कोणतीही तडजोड केली जाणार नाही. मार्चपर्यंत काम पूर्ण होण्यासाठी संबंधित यंत्रणांनी काटेकोरपणे नियोजन करावे. जोपर्यंत उपजिल्हा रुग्णालयाचे काम पूर्ण होत नाही, तोपर्यंत ग्रामीण रुग्णालयाचे कामकाज ट्रॉमा केअर सेंटरमध्ये सुरू राहील. ग्रामीण रुग्णालयाच्या जागेवर प्रस्तावित (पान २ वर)

# तालुक्यात विजेची अवस्था वाईट, वेळप्रसंगी आंदोलन -माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - सध्या राज्यामध्ये दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके पाण्याअभावी सुकत चालली आहे. अशावेळी पिकांना पाणी देणे अत्यंत गरजेचे आहे. मात्र तालुक्यात विजेची अत्यंत वाईट अवस्था आहे. आवर्तन काळामध्ये ११ तास लाईट सुरू ठेवण्याबाबत न्यायालयाचे निर्देश असताना ही लाईट बंद ठेवली जात आहे. लाईट जाते म्हणजे पाणी पुढे पण जाते असे सांगताना शेतकऱ्यांसाठी व नागरिकांसाठी पाणी आणि वीज महत्त्वाची असल्याने वेळप्रसंगी आंदोलन केले जाईल असा इशारा काँग्रेस पक्षाचे नेते माजी कृषिमंत्री बाळासाहेब थोरात यांनी दिला असून तालुक्याच्या हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने वीज मिळालीच पाहिजे अशी मागणी त्यांनी केली आहे.

जिल्हा सहकारी बँकेच्या सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात सभागृहात संगमनेर शेतकी संघाच्या ६७ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी अध्यक्षस्थानी चेअरमन संपतराव डोंगरे हे होते. तर व्यासपीठावर मा. आ.डॉ. सुधीर तांबे, युवक काँग्रेसच्या अध्यक्षा डॉ जयश्री थोरात, पांडुरंग पाटील घुले, आर.बी राहणे, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, व्हाईस चेअरमन सुनील कडलग, रामहरी कातोरे, शरद नाना थोरात, ड. नानासाहेब शिंदे, मॅनेजर अनिल थोरात आदींस अनेक मान्यवर उपस्थित होते.

(पान ३ वर)












# राजहंस हा गुणवत्तेचा व विश्वासाचा अस्सल ब्रँड - माजी मंत्री थोरात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर (प्रतिनिधी) १५०० लिटर पासून सुरू झालेला दूध संघ आज चार लाखापर्यंत संकलन करत आहे. प्रत्येक टप्प्यावर यशस्वी वाटचाल झाली आहे. मुक्त संचार गोठा व मुरघास ही राज्याला दिलेली आपली देन आहे. संगमनेर तालुका सहकारी दूध संघाचे मोठे संरक्षण असल्याने खाजगी वाले भाव देतात. म्हणून ही शेतकऱ्यांची संस्था आपण जपली पाहिजे. निर्भीळ व गुणवत्तेचे दूध हे वैशिष्ट्य असल्याने राजहंस हा गुणवत्तेचा व विश्वासाचा अस्सल ब्रँड बनला असल्याचे गौरवउद्गार काँग्रेसच्या राष्ट्रीय वर्किंग कमिटीचे सदस्य तथा मा. महसूल मंत्री बाळासाहेब थोरात यांनी काढले.

संगमनेर तालुका सहकारी दूध उत्पादक संघाच्या ४९ व्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते यावेळी अध्यक्षस्थानी चेअरमन रणजीतसिंह देशमुख हे होते तर व्यासपीठावर मा. आ. डॉ सुधीर तांबे, बाजीराव पा.खेमनर, पांडुरंग पा. घुले, डॉ. जयश्रीताई थोरात, शंकरराव खेमनर, सुधाकर जोशी, संपतराव डोंगरे, इंद्रजीत भाऊ थोरात, व्हाईस चेअरमन राजेंद्र चकोर, आर.बी. राहणे रामदास पा वाघ, गणपतराव सांगळे, शरद नाना थोरात, अजय फटांगरे, रामहरी कातोरे, संचालक विलासराव वर्पे, संतोष मांडेकर, विलास कवडे, बबन कुराडे, बादशहा वाळुंज , संजय पोकळे, विक्रम थोरात, रमेश गुंजाळ, विष्णू ढोले, तुकाराम दातीर, रवींद्र रोहम, सौ प्रतिभा सोमनाथ जोंधळे, भारत शेठ मुंगसे, डॉ प्रमोद पावसे, कार्यकारी संचालक डॉ सुजित खिलाडी यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना मा. मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, ४९ वर्षांची दुध संघाची वाटचाल ही यशस्वी राहिली आहे .प्रत्येक टप्प्यावर आपण पुढे गेलो .गुणवत्ता हे वैशिष्ट्य असल्याने गुलबर्गा ते सुरत, चंद्रपूर ,अमरावती, नागपूर या ठिकाणी राजहंस दुधाला मोठी मागणी आहे. स्पर्धेत आपण आहोत म्हणून खाजगी वाले भाव देत आहेत. ही शेतकऱ्यांची संस्था आहे तिचे मोठे संरक्षण नागरिकांना मिळत आहे.

संघामुळे गरीब शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद निर्माण झाला असून संघाने आगामी काळात बेकरी उत्पादनाबरोबर गुणवत्ता वाढीसाठी काम करावे याचबरोबर तालुक्यामध्ये सध्या विजेचा खेळखंडोबा सुरू आहे. वीज जाते म्हणजे पाणी जाते. निळवंडे धरण व कालवे आपण पूर्ण केले. त्यावेळेस कोणी मदत केली नाही. आता लाईट बंद केली जाते म्हणजे पाणी पुढे जाते. याबाबत नागरिकांनी जागृत राहिले पाहिजे. कारण काही लोकांना तालुक्याची घडी मोडायची आहे. हा तालुका टिकला पाहिजे.

काही लोक टीका करतात की भावी मुख्यमंत्र्याचा पराभव केला. या शब्दापर्यंत पोहोचण्याकरता विश्वास आणि कष्ट करावा लागतात. पत्रकार परिषदा सध्या खूप वाढल्या आहेत. राज्यात दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. सरकार निर्णय घेत नाही. शेतकऱ्यांना खते मिळत नाही. आपल्या मंत्रिपदाच्या काळात असे काही नव्हते. आता झेन जी जागृत झाली असून जाती धर्माचे राजकारण त्यांना नको आहे विकास शिक्षण भविष्य याबाबत ते विचारत आहे.

तर रणजीतसिंह देशमुख म्हणाले की, लोकनेते बाळासाहेब थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली दूध संघाच्या माध्यमातून सुमारे ६०८ कोटींची उलाढाल झाली असून ५०० कोटी तालुक्यातील शेतकऱ्यांच्या खिशात गेले आहे. त्यातून शेतकऱ्यांच्या कुटुंबात आनंद निर्माण झाला. पन्नास वर्षांची दूध संघाची वाटचाल ही कायम चढत्या दराने राहिली आहे. मागील वर्षी सरासरी ३८ रुपये दर दिले असून सध्या ४१ रुपये प्रति लिटर उच्चांकी दर दिला जात आहे. दूध संघाने टाटा कंपनीचे सोलर बसवले असून त्यातून महिन्याला पंधरा ते वीस लाख रुपयांची वीज निर्मिती होऊ शकते. वाहतूक व्यवस्था सुधारली आहे.

## तुकाराम मुंडे यांच्या भूमिकेला पाठिंबा-रणजीतसिंह देशमुख

**तुकाराम मुंडे यांनी घेतलेली भूमिका ही कौतुकास्पद आहे. यामुळे बनावट दूध निर्माण करणाऱ्यांना मोठी चपराक बसली असून वीस ते पंचवीस टक्के दूध कमी झाले .याचबरोबर भेसळयुक्त पनीर कमी झाले. अशा कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांची गरज आहे. त्यांच्या भूमिकेमुळे राजहंस दूध संघाची विक्री वाढली आहे. गुणवत्ता हेच वैशिष्ट्य आपले राहिले असल्याचे यातून सिद्ध होत असल्याचे चेअरमन रणजीतसिंह देशमुख यांनी म्हटले असून त्यांनीच शासकीय स्तरावर कायम हा विभाग सांभाळावा अशी मागणी करताना त्यांच्या भूमिकेला पाठिंबा असल्याचे म्हणताच उपस्थित सर्वांनी टाळ्यांचा कडकडाट केला.**

# शिर्डीत महाराष्ट्र साई कलारत्न २०२७' चा पुरस्कार अभिनेता, दिग्दर्शक प्रमोद पंडित यांना जाहीर

युवावार्ता (प्रतिनिधी)

शिर्डी - शिर्डीच्या पावन भूमीत राष्ट्रीय पातळीवरील महाराष्ट्र साई कलारत्न २०२७' या ऐतिहासिक व भव्य पुरस्काराचे आयोजन करण्यात आले आहे. ओम साई विकास प्रतिष्ठान व.बी. बी. सी फिल्म प्रोडक्शन, महाराष्ट्र राज्य यांच्या निर्मितीत आणि संस्थापक अध्यक्ष सुदाम संसारे यांच्या अध्यक्षतेखाली हा पुरस्कार सोहळा रविवार दि १० जानेवारी २०२७ रोजी सकाळी ९.३० परिवार लॉन्स, बँकेट हॉल, न्यू रिंग रोड सिटी मार्केट जवळ इंडियन पेट्रोलपंपाजवळ, शिर्डी युयेथे होणार आहे अभिनेता दिग्दर्शक प्रमोद पंडित यांचे अभिनय क्षेत्रात असलेले मोठे योगदान एक ग्रामीण भागातील कलाकार असलेला त्यांचे अनेक चित्रपट व मोठ्या कलाकारांसोबत त्यांचा कामाचा अनुभव त्यांच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदित कलाकारांना फिल्म क्षेत्रात कामाची संधी उपलब्ध करून दिली ग्रामीण भागात आपल्या ग्रामीण क्षेत्रातील कलाकारांना व्यासपीठ मिळवून देण्यात त्यांचे मोठे योगदान आहे याआधी त्यांना अनेक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले आहे त्यांच्या याच कामाची दखल घेत त्यांना हा महाराष्ट्र साई कलारत्न पुरस्कार २०२७ जाहीर झाला



## पान १ वरून घुलेवाडी उपजिल्हा...

स्त्री रुग्णालय उभारता येईल का, याबाबत शासन स्तरावर पाठपुरावा सुरू आहे.

साकूर, चंदनापुरी आणि तळेगाव परिसरातील नागरिकांना शवविच्छेदनासाठी संगमनेर शहरात दूरवर यावे लागू नये, यासाठी या तीन ठिकाणी लवकरात लवकर शवविच्छेदनगृहाची सुविधा उपलब्ध करून द्यावी. जागेचा प्रश्न असल्यास तो माझ्या निदर्शनास आणून द्यावा. तो प्रश्न मार्गी लावला जाईल. ग्रामीण रुग्णालयात स्वच्छ पाणीपुरवठा, पाण्याची टाकी, स्वच्छतागृह तसेच परिसरातील रस्त्यांवरील छोटे-मोठे खड्डे या समस्या तातडीने दूर कराव्यात. ग्रामीण रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांसह त्यांच्या कुटुंबीयांनाही योग्य सेवा व सुविधा मिळाल्या पाहिजेत.

यासाठी ग्रामीण रुग्णालयातील सर्व यंत्रणांनी जबाबदारीने काम करण्याची गरज आहे, असेही आमदार अमोल खताळ यांनी स्पष्ट सांगितले.

## ॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

# प्रेमळ स्व. मीराताई



सौ. मीराताई या तीर्थरूप भाऊसाहेब थोरात यांच्या राजकारण, सहकार आणि समाजकारणातील निमोण येथील खंदे समर्थक तीर्थरूप हरिभाऊ सांगळे यांच्या कन्या. त्यांचा विवाह शेजारच्याच गावातील शेतकरी कुटुंबातील बुद्धिमान, सुस्वभावी आणि आर्किटेक्ट असलेले श्री. भीमाशंकर चकोर यांच्याशी झाला. बांधकाम क्षेत्रात 'बी.आर चकोर' हे एक प्रसिद्ध नाव म्हणून त्यांनी आपली वेगळी ओळख निर्माण केली. त्यांना सौ. कांचन ही एकुलती एक कन्या असून, ती मुंबई येथे मोठ्या पदावर अधिकारी म्हणून कार्यरत आहे.


चकोर साहेब हे देखील माननीय श्री. बाळासाहेब थोरात यांच्या पाठीशी राजकारण आणि सहकार क्षेत्रात खंबीरपणे उभे राहिले आहेत. सौ. मीराताई दिसायला अत्यंत देखण्या, सुंदर आणि प्रसन्न व्यक्तिमत्त्वाच्या होत्या. त्या जिल्हा परिषद सदस्य म्हणून निवडून आल्या आणि महिला व बालकल्याण समितीच्या सभापतीपदाची जबाबदारीही त्यांनी समर्थपणे सांभाळली. त्यांच्या कामाचा झपाटा विलक्षण होता. लहानपणापासूनच त्यांनी आपल्या वडिलांच्या कार्याचा जवळून अनुभव घेतला होता. त्यांचे वडील जिल्हा परिषदेत सभापती होते. त्या काळात नगर येथील जिल्हा परिषद कॉलनीत राहून वडिलांचे कामकाज त्या जवळून पाहत होत्या. त्यामुळेच वडिलांप्रमाणेच त्यांच्यातही जिद्द, चिकाटी आणि चिवटपणा निर्माण झाला होता. मीराताई मनाने अतिशय प्रेमळ आणि दिलदार होत्या. त्यांच्या घरी आलेल्या प्रत्येक व्यक्तीला काही ना काही खाऊ किंवा वानवळा देणे हा त्यांचा जणू आवडताच भाग होता. घरी काही नसेल, तरी त्या आवर्जून साखर किंवा ओळखीची एखादी छोटीशी वस्तू प्रेमाने देत असत. त्यामागे वस्तूचे मोल नव्हते, तर त्यामागची त्यांची माया आणि आपलेपणा महत्त्वाचा होता. मागच्या वर्षी एका यात्रेत त्यांची माझी भेट झाली होती. त्या वेळी त्यांनी मला अतिशय प्रेमाने सुंदर पोळपाट-लाटणे भेट म्हणून दिले. त्या छोट्याशा भेटीतूनही त्यांचे माझ्यावर आणि आमच्यावर असलेले मनापासूनचे प्रेम जाणवले. अशा प्रेमळ, आपुलकीच्या आणि माणुसकी जपणाऱ्या मीराताई आज आम्हा सर्वांना सोडून गेल्या, ही गोष्ट मनाला अतिशय वेदना देणारी आहे. त्यांच्या जाण्याने केवळ त्यांच्या कुटुंबाचेच नव्हे, तर त्यांच्यावर प्रेम करणाऱ्या असंख्य आप्तेष्टांचे, मित्रपरिवाराचे आणि परिचितांचे मोठे नुकसान झाले आहे.

मीराताईंच्या प्रेमळ आठवणी सदैव आमच्या मनात जिवंत राहतील. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो आणि चकोर कुटुंबीयांना हे दुःख सहन करण्याचे बळ देवो.

**सौ. दुर्गाताई तांबे**
**माजी नगराध्यक्षा, संगमनेर नगरपालिका**

# आदर्श शिक्षक कै. उमाजी शंकरराव भागवत गुरुजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली

## इतरांना मोठे झालेले पाहण्यात आनंद मानणारे - भागवत गुरुजी



**तुका म्हणे एक मरणाची सरे !**
**उत्तमची उरे किर्ती मागे !!**

मानवी जीवनात जन्म आणि मृत्यू या दोन शाश्वत बाबी आहेत. माणूस किती वर्षे जगला यापेक्षा तो कसा जगला, त्याने समाजासाठी काय केले आणि किती माणसांच्या जीवनाला स्पर्श केला, यावर त्याच्या जीवनाचे खरे मूल्य ठरते. चित्तळवेढे (ता. अकोले) येथील सुपुत्र कै. उमाजी शंकरराव भागवत गुरुजी यांनी आपल्या ९७ वर्षांच्या प्रदीर्घ आयुष्यात शिक्षण, सामाजिक आणि धार्मिक क्षेत्रात केलेले कार्य यामुळे ते सर्वांच्या स्मरणात कायम राहतील.

दि. १० सप्टेंबर २०२६ रोजी वृद्धापकाळाने त्यांचे निधन झाले. 'भागवत काका' या नावाने ते सर्वत्र परिचित होते. गेली सुमारे ७५ वर्षे त्यांनी विविध क्षेत्रांत समर्पितपणे योगदान दिले. विशेषतः शिक्षण क्षेत्रातील त्यांचे कार्य आणि समाजातील त्यांचे स्थान अनेकांसाठी प्रेरणादायी राहिले.

**प्रतिकूल परिस्थितीत शिक्षणाची वाट**

चित्तळवेढे येथे चौथीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर चार मैल दूर असलेल्या राजूर येथे पायी जाऊन त्यांनी सातवीपर्यंत शिक्षण पूर्ण केले. त्याकाळी माध्यमिक शिक्षणाच्या सुविधा मर्यादित होत्या. त्यातच त्यांचे वडील कै. शंकरराव भागवत हे पंचक्रोशीतील मान्यवर सुतार कारागीर होते. चार गावांच्या बलुतेदारीचा मोठा व्याप असल्याने वडिलांना मदत करण्यासाठी उमाजी गुरुजींना शिक्षण थांबवून घरच्या व्यवसायात लक्ष घालावे लागले.

चित्तळवेढे हे गाव धार्मिक आणि सात्त्विक वातावरणासाठी ओळखले जात होते. गावात होणाऱ्या कीर्तन-प्रवचनांच्या माध्यमातून गुरुजींवर लहानपणापासूनच धार्मिक व सुसंस्कारांचे संस्कार झाले. वडिलांचा शिस्तप्रिय, सामाजिक आणि नेतृत्वगुणांनी संपन्न स्वभावही त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर प्रभाव टाकणारा ठरला.

**ज्ञानदानाचा अखंड यज्ञ**

नोकरीसाठी केलेल्या अर्जाची दखल घेत त्यांना जिल्हा परिषद शिक्षण मंडळात शिक्षक म्हणून संधी मिळाली. अकोले तालुक्यातील धामणगाव पाट येथे त्यांच्या ज्ञानदान यज्ञाचा प्रारंभ झाला.

शिक्षक म्हणून त्यांनी केवळ अभ्यासक्रम शिकविण्यावर भर न देता विद्यार्थ्यांना सुसंस्कारित, जबाबदार आणि ध्येयवादी नागरिक घडविण्याला प्राधान्य दिले.

**गुरु तेथे ज्ञान ! ज्ञानी आत्मदर्शन !**
**दर्शनी समाधान ! आथी जैले !!**

'गुरु' ही उपाधी त्यांनी केवळ अर्थार्जनाचे साधन न मानता तिचे खरे दायित्व आयुष्यभर जपले. आपले विद्यार्थी मोठे व्हावेत, विविध क्षेत्रांत यश मिळवावे, ही त्यांची कायमची धारणा होती. त्यांच्या शिकवणीचे संस्कार घेतलेले असंख्य विद्यार्थी आज वकील, डॉक्टर, अभियंते, प्राध्यापक, शिक्षक आदी विविध क्षेत्रांत कार्यरत आहेत. या विद्यार्थ्यांच्या यशात आपला वाटा असल्याचे समाधान त्यांना शेवटपर्यंत लाभले.

कै. भागवत गुरुजी यांनी टाहाकारी, विठे, चित्तळवेढे येथे मुख्याध्यापक म्हणून, तर लिंगदेव येथे गटप्रमुख म्हणून प्रामाणिकपणे सेवा बजावली. चित्तळवेढे येथील चौथीपर्यंतच्या शाळेला पुढील वर्गांची मान्यता मिळवून देत ती सातवीपर्यंत करण्याचे महत्त्वपूर्ण कार्यही त्यांनी केले.

**कुटुंबाची जबाबदारीही समर्थपणे सांभाळली**

गुरुजी कुटुंबातील सर्वांत मोठे. त्यांना चार भाऊ आणि तीन बहिणी. नोकरी सांभाळतानाच धाकट्या भावंडांचे शिक्षण, लग्नकार्य आणि त्यांच्या गरजा पूर्ण करण्याची मोठी जबाबदारी त्यांनी पार पाडली. त्यामुळे शिक्षकाच्या भूमिकेबरोबरच कुटुंबप्रमुखाचे दायित्वही त्यांनी अत्यंत समर्थपणे निभावले.

राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांशी त्यांचा स्नेह होता. मात्र कोणत्याही राजकीय विचारांचा प्रभाव स्वतःवर होऊ न देता त्यांनी समाजकार्यात आपली स्वतंत्र भूमिका जपली. पंचायत समितीचे माजी उपसभापती कै. किसन नाना आरोटे यांच्याशी त्यांचे अखेरपर्यंत जिव्हाळ्याचे संबंध होते.

सामाजिक व धार्मिक कार्यातही योगदान

शिक्षणाबरोबरच सामाजिक व धार्मिक कार्यातही भागवत गुरुजींचा सक्रिय सहभाग होता. श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील विश्वकर्मा समाज धर्मशाळेच्या विकासात त्यांनी महत्त्वाचे योगदान दिले. संस्थेचे हिशोब लिहिण्याची जबाबदारी सांभाळण्याबरोबरच सुमारे ५० वर्षे तेथे अन्नदानाची सेवा केली.

चित्तळवेढे येथील हनुमान मंदिराच्या उभारणीच्या काळात मंदिराच्या जमाखर्चाची जबाबदारी त्यांनी अत्यंत काटेकोरपणे सांभाळली. विठ्ठल मंदिराच्या उभारणीतही त्यांनी योगदान दिले. वरसुआई माता मंदिराच्या जीर्णोद्धारासाठी सहकार्य करतानाच वार्षिक यात्रोत्सव सुरू करण्यासाठी पुढाकार घेतला. गावातील हरिनाम सप्ताहाच्या आयोजनात तसेच त्याच्या हिशोबाच्या कामातही त्यांनी सातत्याने योगदान दिले.

चित्तळवेढे येथील गोपाळ दूध संस्थेचे काही काळ अध्यक्ष म्हणून, तसेच विठे व चित्तळवेढे विविध कार्यकारी सोसायटीचे अनेक वर्षे उपाध्यक्ष म्हणून त्यांनी जबाबदारी सांभाळली.

**समृद्ध संस्कारांचा वारसा**

कै. भागवत गुरुजी यांना तीन मुले आहेत. थोरले चिरंजीव सुभाष हे शासकीय तंत्रनिकेतन अभियांत्रिकी विद्यालयातून उपप्राचार्य पदावरून निवृत्त झाले आहेत. द्वितीय चिरंजीव शरदनाना ठाणे येथे कंपनीत कार्यरत आहेत. तिसरे चिरंजीव किरण भागवत सर हे राजूर येथील श्री स्वामी समर्थ माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात प्राचार्य म्हणून कार्यरत आहेत. हिंदी भाषेतील प्रावीण्याबरोबरच राष्ट्रभाषा हिंदीच्या प्रचार-प्रसारासाठी ते कार्यरत आहेत.

त्यांचे जावई ह.भ.प. दीपक जेवणे हे 'भारतीय विचार साधना' संस्थेचे संपादक असून श्रीक्षेत्र आळंदी येथे 'कीर्तन प्रबोधिनी' या वारकरी शिक्षण संस्थेचे कार्य पाहतात. अन्य दोन जावईही विविध क्षेत्रांत कार्यरत राहिले आहेत. त्यांचे पाचही नातू उच्च शिक्षण घेऊन विविध नामांकित क्षेत्रांत कार्यरत आहेत.

त्यांचे बंधू ह.भ.प. शिवनाथबुवा हे वारकरी संप्रदायाचे उपासक व कीर्तन-प्रवचनकार आहेत. धाकटे बंधू नारायण भागवत हे श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर येथील विश्वकर्मा धर्मशाळेचे विश्वस्त असून पुणे (सांगवी) येथील विविध सामाजिक संस्थांशीही संबंधित आहेत.

**संयमी व सात्त्विक व्यक्तिमत्त्व**

कै. भागवत गुरुजींचे बोलणे अत्यंत संयमी, नम्र आणि सात्त्विक होते.

**साच आणि मवाळ ! मितुले आणि रसाळ !!**
**शब्द जैसे कल्लोळ ! अमृताचे !!**

या संतवचनाप्रमाणे त्यांची वाणी आणि वर्तन सर्वांना आपलेसे करणारे होते. आपल्या संपर्कातील असंख्य व्यक्तींनी जीवनात यश मिळविलेले पाहून त्यांना मनापासून समाधान वाटत असे. इतरांना मोठे झालेले पाहण्यातच त्यांना खरा आनंद मिळत होता.

दि. १० सप्टेंबर रोजी त्यांनी इहलोकीच्या प्रवासाचा समारोप केला. त्यांच्या निधनाने केवळ भागवत परिवाराचाच नव्हे, तर असंख्य विद्यार्थी, मित्र, आप्तेष्ट आणि समाजाचा आधारवृक्ष हरपला आहे. ९७ वर्षांचे प्रदीर्घ आयुष्य जगताना त्यांनी संपादन केलेला स्नेह, आदर आणि सद्भावनांचा ठेवा हीच त्यांच्या जीवनकार्याची खरी कमाई आहे.

त्यांचे प्रदीर्घ कार्य आणि त्यांनी जोडलेला स्नेहसमूह त्यांना कधीही विसरू शकणार नाही.

**गेले दिगंबर ईश्वर विभूती !**
**राहिल्या त्या कीर्ती जगामाजी !!**
**वैराग्याच्या गोष्टी ऐकल्या ज्या कानी !**
**पुन्हा ऐसे कोणी होणे नाही !!**

कै. उमाजी शंकरराव भागवत गुरुजी यांना भावपूर्ण श्रद्धांजली!

**शब्दांकन – नारायण भागवत**
**पुणे व भागवत परिवार, चित्तळवेढे**

# आयुष्यभर प्रेम, संस्कार आणि मायेची सावली देणारे 'काका' हरपले

आमचे वडील कै.उमाजी शंकरराव भागवत यांचे दि.१०-०९-२०२६ रोजी वृद्धापकाळाने देहावसान झाले. आमचे काका गेले. आमच्या परिवाराचा आधारवड कोसळला. खरंतर वडिलांचे छत्र हरपणे म्हणजे डोक्यावरचे आभाळच नाहिसे होणे आहे.


मानवी जीवनात मृत्यू हे अंतिम सत्य आहे.तरीपण काका तुमचे जाणे आमच्या सर्वांच्या मनाला चटका लावून गेले आहे. खरंतर तर काका वडिलांचे छत्र जोपर्यंत आमचे डोक्यावर होते, तोपर्यंत आमचे जीवनात कोणत्याही प्रसंगाची झळ बसत नव्हती. वडिलांचे निधन ही जीवनातील कधीच न भरून येणारी पोकळी आहे.

काका, आपण आयुष्यभर स्वतः कष्ट सोसून आम्हा मुला-मुलींचे भविष्य उजळविले. स्वतःचे विचार आणि गरजा नेहमीच दूर ठेवल्या. तुम्ही केवळ आमचे वडील नव्हता तर एक आदर्श मार्गदर्शक आणि भक्कम असा आधारस्तंभ होते. वयाच्या वाढत्या टप्प्यातवर तुमचे शरीर जरी थकले होते, तरी तुमचे हास्य, मार्गदर्शन आणि आशिर्वाद आम्हाला जीवन जगण्यासाठी सतत आठवत राहील. काका, तुम्ही वेळोवळी आम्हाला केलेले मार्गदर्शन,शिकवण आणि संस्कार आमच्या पुढील जीवनप्रवासात नक्कीच प्रेरणा देत राहील. तुमचे जाणे हे आमच्यासाठी खूपच वेदनादायी आहे. काका, आम्हाला घडवताना आपण आमचेवर केलेले संस्कार, आणि आदर्श प्रवासाची शिकवण आम्ही सदैव आठवणीत ठेऊ. तसेच तुमचे आदर्श विचार, इतर सर्वांप्रती असणारी सहिष्णुता आणि समाजाप्रती असलेले दातृत्व, ही मौलिक जीवन तत्वे आम्ही सदैव स्मरणात ठेवून तुमच्याच मार्गावर जीवनाची वाटचाल करीत राहाण्याची ग्वाही आपणास देत आहोत. आज यापुढे आपण आमचे बरोबर नाहीत तरीपण तुमचा आशिर्वाद आणि सदिच्छा कायमच आमच्या पाठीशी राहातील.

काका, आपणास आमचेकडुन भावपूर्ण श्रद्धांजली......

!! ओम शांती !!

**प्रा. किरण उमाजी भागवत**
**चित्तळवेढे, ता. अकोले, जि.अ.नगर**



॥ भावपूर्ण श्रद्धांजली ॥

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी
मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# नावीन्यपूर्ण उपक्रमांच्या माध्यमातून नाशिक विभागात राबविण्यात येणार सेवा संकल्प अभियान

नाशिक- नाविन्यपूर्ण उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी, विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा थेट लाभ लाभार्थ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी सेवा संकल्प अभियानाच्या माध्यमातून नाशिक विभागाने तयारी केली असल्याची माहिती प्रभारी विभागीय आयुक्त तथा नाशिकचे जिल्हाधिकारी आयुष प्रसाद यांनी दिली. सर्व जिल्ह्यांनी विविध प्रशासकीय विभागाच्या माध्यमातून याची अंमलबजावणी करावी आणि त्याला व्यापक प्रमाणात सर्वसामान्यांपर्यंत विविध माध्यमातून पोहचवण्याच्या सूचना त्यांनी दिल्या.

श्री. आयुष प्रसाद यांनी आज सेवा संकल्प अभियान अंमलबजावणी आणि त्यासंदर्भात सर्व जिल्ह्यांनी केलेले नियोजन यासंदर्भात बैठक घेतली. त्यावेळी ते बोलत होते. धुळे जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, नंदुरबार जिल्हाधिकारी डॉ. मिताली सेठी, जळगाव जिल्हाधिकारी रोहन घुगे, पाचही जिल्ह्याचे जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, नाशिक मनपाचे अतिरिक्त आयुक्त अमित रंजन, माहिती उपसंचालक डॉ. किरण मोघे हे दूरदृष्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. तर अपर आयुक्त जितेंद्र वाघ, अपर आयुक्त अरविंद लोखंडे, सहायक आयुक्त विठ्ठल सोनवणे, क्रीडा उपसंचालक स्नेहल साळुंखे, महिला व बालविकास विभागीय उपायुक्त चंद्रशेखर पगारे, कौशल्य विकास विभागाचे उपायुक्त प्रकाश देशमाने यांच्यासह विभागीय आयुक्तालयातील विविध विभागांचे प्रमुख यावेळी उपस्थित होते. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील २५ वर्षांच्या कारकिर्दीनिमित्त तसेच सामान्य नागरिकांपर्यंत विविध शासकीय सेवा आणि लोककल्याणकारी योजनांचा लाभ जलदगतीने पोहोचवण्यासाठी राज्य शासनाने १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर 'सेवा संकल्प अभियान' राबवण्यात येत आहे. त्या अनुषंगाने नाशिक विभागातील पाच जिल्ह्यांचा नियोजनाचा आढावा प्र. विभागीय आयुक्त श्री. प्रसाद यांनी घेतला.

तालुकास्तरावर सेवा सेतू अभियान अंतर्गत शिबिरे, छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिरे आयोजित करून शासनाच्या विविध सेवांचे लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यात यावेत. राज्यातील युवा, विद्यार्थी, स्टार्टअप्स, व्यवसायिक व कॉर्पोरेट इनोव्हेटर्स व ग्रामीण भागातील नविन समाधाने (डेश्रींळेपी) विकसित करणाऱ्या लोकांना जोडण्यासाठी राज्यस्तरीय इनोव्हेशन चॅलेंज आयोजित करण्यात यावे.

सेवा माझे योगदान या उपक्रमाचे प्रत्येक गावात / वार्डात आयोजन करण्यात यावे. याअंतर्गत लोकसहभागून रक्तदान, स्वच्छता, वृक्षारोपण, आरोग्य तपासणी मोहीम आदी विविध उपक्रम राबविण्यात यावेत. विकसित भारत संकल्प यात्रा, सेवा ज्योत यात्रेचे आयोजन करण्यात यावे. शासकीय व खाजगी शाळांमध्ये शालेय विद्यार्थ्यांच्या चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात यावे. सर्व अंगणवाड्यांच्या पातळीवर अंगणवाडी उत्सवाचे आयोजन करण्यात यावे. याशिवाय आशीर्वादाचा दिवा, बदलाची गोष्ट, आभार आणि संकल्पाची रांगोळी, नमो सेवागाथा, जल, जन आणि सेवा संकल्प यात्रा, जनसेवक महाकुंभ या कार्यक्रमांचे आयोजनाचे निर्देश आहेत. त्या अनुषंगाने कार्यवाहीच्या सूचना त्यांनी दिल्या.

प्रत्येक जिल्ह्याने नावीन्यपूर्ण उपक्रम राबवावेत. एका जिल्ह्यातील चांगल्या उपक्रमांची विभागातील इतर जिल्ह्यांनीही अंमलबजावणी करावी. थेट लाभ लाभार्थ्यांपर्यंत जाईल यादृष्टीने नियोजन आणि प्रत्यक्ष अंमलबजावणी अपेक्षित आहे. यापूर्वी राबविण्यात आलेल्या अभियानातील उद्दिष्टपूर्तीपेक्षा अधिक चांगले योगदान प्रत्येक जिल्ह्याचे अपेक्षित असल्याचे त्यांनी सांगितले. यासंदर्भात शासन निर्णयातील नमूद बाबीवर अधिक भर देऊन त्याप्रमाणे कार्यवाहीच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी संबंधित जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी त्यांच्या जिल्ह्यातील सेवा संकल्प अभियानाचे नियोजन सांगितले तर सदस्य सचिव तथा माहिती उपसंचालक डॉ. मोघे यांनी , या अभियानातील राबविण्यात येणाऱ्या विविध बाबींची माहिती, फोटो, रील्स ही प्रसिद्धीच्या अनुषंगाने जिल्हा पातळीवर संबंधित जिल्हा माहिती अधिकारी कार्यालयास उपलब्ध करून देण्याचे आवाहन केले.

# "सेवा संकल्प अभियान" राजूर प्रकल्प कार्यालय अंतर्गत उपक्रमाचा शुभारंभ



युवावार्ता (प्रतिनिधी)

राजूर - देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संविधानिक पदावरील कारकीर्दीला २५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त व त्यांनी त्यांच्या कार्यकाळात सेवा परमोधर्म या उक्तीप्रमाणे सामान्य नागरीकांपर्यंत सेवा पोहचविण्याचा अविरत प्रत्यन केला आहे. त्यांच्या सेवा कार्याचा लाभ सामान्य नागरिकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने दि. १७ सप्टेंबर, २०२६ ते १७ ऑक्टोबर, २०२६ या कालावधीत राज्यात सेवा संकल्प अभियान राबविण्याचा शासनाने निर्णय घेतलेला आहे.

अंतर्गत सेवा संकल्प अभियानाचा शुभारंभ व शासकीय योजनांच्या चित्ररथाचे उद्घाटन चिचोंडी, येथून मा.आ. डॉ. किरण लहामटे, यांच्या शुभ हस्ते करण्यात आले.

सदर प्रसंगी सेवा संकल्प अभियानाची माहिती उपस्थित आदिम जमाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना दिली. शासनाच्या विविध योजनांची माहिती संबंधित शासकीय यंत्रणांनी लाभार्थ्यांना द्यावी व पात्र लाभार्थ्यांना लाभ मिळवून देण्याबाबत संबंधित शासकीय यंत्रणानी कामकाज करणे बाबत सूचित केले. तसेच शासकीय योजनांची माहिती चित्ररथाच्या माध्यमाधून सर्व आदिवासी क्षेत्रातील आदिम जमाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांना देण्याचे निर्देश दिले.

सदर शिबिराप्रसंगी उपस्थित आदिम जमाती व अनुसूचित जमातींच्या लाभार्थ्यांसाठी आधारकार्ड, रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना लाभ देणे, आयुष्यमान भारत कार्ड, आरोग्य तपासणी, एकात्मिक बाल विकास योजनेचा लाभ देणे, इ. योजनेचा लाभ लाभार्थ्यांना देण्यात आला. सदर अभियानात चिचोंडी, येथे अंदाजित ४०० ते ५०० लाभार्थ्यांनी आपला सहभाग नोंदविला.

सदर प्रसंगी प्रकल्प अधिकारी श्रीम. देवकन्या बोकडे, मा. तहसीलदार सिद्धार्ध मोरे,गट विकास अधिकारी, अमर माने, सरपंच कविता मधे, चिचोंडी, तालुका आरोग्य अधिकारी,शामकांत शेटे, केदार नागरे, बाल विकास प्रकल्प अधिकारी, वन परिक्षेत्र अधिकारी,दत्तात्रय पडवळ, श्रीमती प्रतिभा सोनवणे, रुपेश गावित, सहाय्यक प्रकल्प अधिकारी,मनोजकुमार पैठणकर, तुषार पवार, योगेश ढोणे, दीपक कालेकर आदी सह सर्व शासकीय यंत्रणांचे अधिकारी व कर्मचारी, जिल्हा परिषद शाळेतील सर्व शिक्षक व मौजे चिचोंडी येथील ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रास्ताविक प्रकल्प अधिकारी श्रीम. देवकन्या बोकडे, यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजेंद्र चौधरी,आभार प्रदर्शन प्रमोद शिंदे यांनी केले.

# कवी अनंत फंदी नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात

## नाटक, संगीत, सांस्कृतिक कार्यक्रमांसाठी मिळणार हक्काचे भव्य व्यासपीठ



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेरच्या कला आणि सांस्कृतिक क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण ठरणाऱ्या कवी अनंत फंदी नाट्यगृहाचे काम आता अंतिम टप्प्यात आले असून, लवकरच हे नाट्यगृह संगमनेरच्या नाट्यरसिकांच्या सेवेत दाखल होणार आहे. नुकतीच आमदार सत्यजित तांबे यांनी नाट्यगृहाची पाहणी करून सुरू असलेल्या कामाची माहिती घेतली.

सुमारे एक हजार प्रेक्षकांची आसनक्षमता असलेले हे नाट्यगृह संगमनेरच्या सांस्कृतिक क्षेत्राला नवी दिशा देणारे ठरणार आहे. तालुक्याच्या ठिकाणी एवढ्या मोठ्या क्षमतेचे नाट्यगृह उभारले जात असल्याने संगमनेरच्या शिरपेचात आणखी एक मानाचा तुरा रोवला जाणार आहे. या नाट्यगृहाच्या माध्यमातून नाट्यप्रयोग, संगीत मैफिली, सांस्कृतिक कार्यक्रम, चित्रपट महोत्सव तसेच स्थानिक कलाकारांना आपली कला सादर करण्यासाठी हक्काचे आणि दर्जेदार व्यासपीठ उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संगमनेर आणि परिसरातील कलाकार, नाट्यसंस्था तसेच रसिकांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

नाट्यगृहासाठी राज्य शासनाचे सहकार्य मिळावे, यासाठी माजी मंत्री बाळासाहेब थोरात, आमदार सत्यजित तांबे, संगमनेर नगरपरिषद यांनी वेळोवेळी पाठपुरावा केला असून, विधिमंडळातही हा विषय मांडला आहे. दरम्यान, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे अध्यक्ष आणि ज्येष्ठ अभिनेते प्रशांत दामले यांनीही नाट्यगृहाला भेट देऊन कामाची पाहणी केली होती. त्यांच्या पाहणीदरम्यान करण्यात आलेल्या सूचनांचा विचार करून आवश्यक ते बदल करण्यात आल्याचे सांगण्यात आले.

संगमनेरला कला आणि संस्कृतीची समृद्ध परंपरा लाभली आहे. कवी अनंत फंदींपासून शाहीर विठ्ठल उमप, रघुवीर खेडकर, कांताबाई यांच्यासह अनेक कलावंतांनी आपल्या कलेच्या माध्यमातून या भूमीची सांस्कृतिक ओळख अधिक समृद्ध केली आहे. या परंपरेला आधुनिक काळात नवे व्यासपीठ मिळावे, यासाठी कवी अनंत फंदी नाट्यगृह महत्त्वाची भूमिका बजावणार आहे.

नाट्यगृहाचे काम अंतिम टप्प्यात पोहोचल्याने आता त्याच्या उद्घाटनाची आणि प्रत्यक्ष सांस्कृतिक कार्यक्रमांना सुरुवात होण्याची प्रतीक्षा संगमनेरकरांना लागली आहे. हजारो रसिकांच्या सांस्कृतिक अपेक्षांना आकार देणारे हे नाट्यगृह लवकरच संगमनेरच्या कला-संस्कृतीचे नवे केंद्र बनणार आहे.

# पान १ वरून तालुक्यात विजेची अवस्था...

यावेळी बोलताना माजी मंत्री बाळासाहेब थोरात म्हणाले की, यशवंतराव चव्हाण यांनी कृषी औद्योगिक क्रांती मधून शेतकऱ्यांसाठी बाजार समिती शेतकी संघ व सहकारी संस्था उभ्या केल्या. अमृत उद्योग समूहातील सहकारी संस्थांची शेतकी संघ ही मातृ संस्था आहे. राज्यातील अनेक शेतकी संघ मोडकळीच आले असताना संगमनेरचा शेतकी संघ मात्र दिमाखात उभा आहे.

यावेळी थोरात म्हणाले की, सध्या तालुक्यामध्ये विजेची अत्यंत वाईट अवस्था आहे. याबाबत कोणी बोलत नाही. काँग्रेस कार्यकर्त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आहे. शेतकऱ्यांसाठी पाणी आणि वीज अत्यंत महत्त्वाची आहे. वीज जाते म्हणजे पाणी पुढे जाते हे लक्षात घ्या.

निळवंडे धरण व दोन्ही कालवे आपण पूर्ण केले. त्यावेळेस कुणी मदतीला आले नाही. संगमनेर शहरासाठी धरणातून थेट पाईपलाईन योजना राबवली. आता डाव्या व उजव्या दोन्ही कालव्यांना अस्तरीकरण करून पाणी पुढे नेले जात आहे. तालुक्याच्या हक्काचे पाणी तालुक्याला मिळाले पाहिजे. याचबरोबर तालुक्यात विजेचा मोठा खेळखंडोबा आहे. रात्री ६ ते ९ या वेळेस सर्वत्र लोड शेडिंग केले जात आहे. मागील तीन-चार दिवसात तर पूर्णपणे विस्कळीतपणा झाला आहे. त्यावर कुणाचे नियंत्रण नाही.

१९८९ मध्ये भंडारदरा धरणाचे ३० टक्के हक्काचे पाणी आपण मिळवले. त्यानंतर मा. न्यायालयातून आवर्तन काळामध्ये ११ तास वीज मंजूर करून घेतली. हे सर्व संघर्ष करून मिळवले आहे. ते टिकवले पाहिजे. मात्र मागील दोन वर्षापासून पाणी व विजेबाबत पूर्णपणे अन्याय केला जात आहे. त्याबाबत कोणी बोलत नाही. शेतकरी व नागरिकांनी याबाबत जागरूक झाले पाहिजे.

तालुक्यात व सर्वत्र दुष्काळ सदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे. पिके सुकू लागली आहेत. पिकांना पाण्याची गरज आहे. अशावेळी विजेचा गोंधळ निर्माण केला जात जात आहे. तालुक्याचे हक्काचे पाणी व पूर्ण दाबाने सुरळीत वीज मिळालीच पाहिजे अन्यथा वेळप्रसंगी आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल असा इशारा त्यांनी सत्ताधाऱ्यांना दिला.

यावेळी संगमनेर तालुक्यातील विविध संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, सेवा सोसायटी यांची प्रतिनिधी चेअरमन व्हाईस चेअरमन व संचालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# नूतन कला महाविद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा




युवावार्ता (प्रतिनिधी)

राजापूर- नूतन कला महाविद्यालय, राजापूर येथे हिंदी दिन विविध उपक्रमांनी उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बाबासाहेब वर्पे होते, तर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रवीण आहेर सर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. खतोडे मॅडम यांनी केले. यावेळी हिंदी विभागप्रमुख प्रा. गायकवाड आर. आर. सर यांनी हिंदी भाषेचे महत्त्व, तिची वैशिष्ट्ये तसेच देशाच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि साहित्यिक जडणघडणीत हिंदी भाषेने दिलेले योगदान याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.


प्रमुख पाहुणे डॉ. प्रवीण आहेर यांनी 'हिंदी साहित्यिकांचे योगदान' या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. हिंदी साहित्याच्या विकासात विविध साहित्यिकांनी दिलेले योगदान, हिंदी साहित्याची समृद्ध परंपरा आणि साहित्याच्या माध्यमातून समाजमनावर झालेला परिणाम याबाबत त्यांनी विद्यार्थ्यांना माहिती दिली. कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवत हिंदी कविता सादर केल्या. तसेच देशभक्तीपर गीते सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. काही विद्यार्थ्यांनी हिंदी भाषेविषयी आपले मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे कार्यक्रमाला विशेष रंगत आली. यावेळी महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. जांगिड मॅडम, प्रा. साबळे मॅडम यांच्यासह महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. हिंदी विभागाचे प्रा. गायकवाड आर. बी. सर यांनी उपस्थितांचे आभार मानले. विविध शैक्षणिक व सांस्कृतिक उपक्रमांनी परिपूर्ण असा हिंदी दिनाचा कार्यक्रम पार पडला.

# स्पर्धा परीक्षा आणि देश विदेशातील उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्तीची सुविधा - सय्यद

युवावार्ता (प्रतिनिधी)

पदवी शिक्षण पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांची तयारी करणे, देश विदेशातील नामांकित विद्यापीठांमध्ये उच्च शिक्षण घेण्यासाठी महाराष्ट्र आणि केंद्र शासनाच्यावतीने शिष्यवृत्तीच्या योजना आहेत. तसेच वैद्यकीय आणि अभियांत्रिकी अभ्यासक्रमांना प्रवेश घेण्यासाठी आवश्यक प्रवेश पूर्व परीक्षांसाठी शिष्यवृत्ती मिळते. विद्यार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर प्रशिक्षण संस्था पुणेचे अहिल्यानगर जिल्हा समन्वयक दिलावर सय्यद यांनी केले.

डॉ. आर. एस. गुंजाळ वेलफेअर फाउंडेशन संचलित मेडिकल, कृषी आणि नर्सिंग कॉलेजच्या विद्यार्थ्यांसाठी संस्थेच्या सेमिनार हॉलमध्ये शैक्षणिक योजना माहितीपर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी दिलावर सय्यद यांनी ही माहिती दिली. याप्रसंगी समाज कल्याण विभाग अहिल्यानगरचे संगमनेर विभागाचे समन्वयक रजत अवसक, संतोष शिंदे, वृंदावन कृषी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अशोक वाळुंज नर्सिंग कॉलेजचे प्राचार्य फारूक दिलावर, संस्थेचे जनसंपर्क अधिकारी काशिनाथ गुंजाळ उपस्थित होते.



दिलावर सय्यद म्हणाले पूर्वी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध स्पर्धा परीक्षांच्या तयारीसाठी पार्टी सारथी महाज्योती आरटी यासारख्या संस्थांकडून विविध प्रकारच्या शिष्यवृत्तीची सुविधा उपलब्ध आहे. परीक्षा प्रशिक्षण प्रवास खर्च मुलाखतीची तयारी यासारख्या बाबींचा त्यात समावेश आहे. विद्यार्थ्यांची निवड चाचणी परीक्षेद्वारे घेतली जाते त्यासाठी संबंधित विभागाच्या पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. दहावीनंतर वैद्यकीय अथवा अभियांत्रिकी शाखेचे शिक्षण घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी देखील जे आणि नीट या प्रवेश पूर्व परीक्षांच्या प्रशिक्षणाची देखील सुविधा विद्यार्थ्यांना उपलब्ध आहे.

# संपादकीय...

## वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी कोणाची?

एकेकाळी घरातील ज्येष्ठ व्यक्ती म्हणजे कुटुंबाचा आधार, अनुभवाचा खजिना आणि निर्णयांचा केंद्रबिंदू मानला जायचा. त्यांच्या शब्दाला घरात मान होता, त्यांच्या अनुभवातून पुढच्या पिढीला दिशा मिळायची. आई-वडिलांनी आपल्या मुलांसाठी आयुष्यभर कष्ट केले, स्वतःच्या इच्छा बाजूला ठेवल्या आणि मुलांच्या शिक्षणापासून संसार उभा करण्यापर्यंत प्रत्येक टप्प्यावर त्याग केला. मात्र आज बदलत्या जीवनशैलीत अनेक वृद्ध आई-वडील आपल्या मुलांच्या घरात असूनही मानसिकदृष्ट्या एकाकी होताना दिसतात. त्यामुळे प्रश्न निर्माण होतो-वृद्ध आई-वडिलांची जबाबदारी नेमकी कोणाची? हा प्रश्न केवळ कायद्याचा नाही, तर माणुसकीचा आहे. मुलांना वाढवताना आई-वडिलांनी कधीही हिशेब ठेवला नाही. मुलगा मोठा झाल्यावर त्याने किती परतफेड करावी, याचा त्यांनी कधी विचार केला नाही. स्वतःच्या गरजा कमी करून मुलांच्या गरजा पूर्ण केल्या. मुलांच्या शिक्षणासाठी कर्ज काढले, त्यांच्या भविष्याची स्वप्ने पाहिली, आजारपणात रात्र जागून काढली आणि मुलांनी आयुष्यात उभे राहावे म्हणून आयुष्याची पुंजी खर्च केली. मग वृद्धापकाळात त्याच आई-वडिलांना प्रेम, वेळ आणि आधार देण्याची वेळ आली, तेव्हा जबाबदारीची चर्चा का व्हावी? आज संयुक्त कुटुंबव्यवस्था हळूहळू कमी होत आहे. शिक्षण, नोकरी आणि व्यवसायाच्या संधींसाठी तरुण शहरांकडे किंवा परदेशात जात आहेत. स्वतंत्र कुटुंब ही आधुनिक जीवनाची गरज बनली आहे. हे वास्तव नाकारता येणार नाही. मात्र स्वतंत्र संसार म्हणजे आई-वडिलांपासून भावनिकदृष्ट्या स्वतंत्र होणे नव्हे. दूर राहणे अपरिहार्य असेल, तरी त्यांच्याशी नियमित संवाद साधणे, त्यांच्या आरोग्याची काळजी घेणे, आर्थिक गरजा समजून घेणे आणि त्यांना आपण त्यांच्यासोबत आहोत, ही भावना देणे शक्य आहे. वृद्धापकाळात माणसाला सर्वाधिक गरज असते ती पैशांची नव्हे, तर आपलेपणाची. औषधे वेळेवर मिळणे महत्त्वाचे आहेच; पण औषध देताना प्रेमाने विचारणारा हातही तितकाच महत्त्वाचा असतो. मोठ्या घरात सर्व सुविधा असूनही जर आई-वडिलांशी दोन शब्द बोलायला मुलांना वेळ नसेल, तर त्या सुविधांचा उपयोग काय? मोबाईलवर जगाशी तासन्तास संवाद साधणारी पिढी आपल्या घरातील वृद्ध व्यक्तीशी काही मिनिटे बोलण्यासाठी वेळ काढू शकत नसेल, तर ही केवळ कौटुंबिक नव्हे, तर सामाजिक शोकांतिका आहे.काही वेळा परिस्थिती वेगळीही असते. मुलांना स्वतःच्या आर्थिक अडचणी असतात, नोकरीची अनिश्चितता असते किंवा परदेशात राहण्यामुळे प्रत्यक्ष सेवा करणे शक्य होत नाही. अशा वेळी केवळ मुलांनाच दोष देणे योग्य नाही. वृद्धांच्या सुरक्षिततेसाठी समाज, स्थानिक प्रशासन आणि शासन यांचीही भूमिका महत्त्वाची आहे. वृद्धाश्रम ही अंतिम व्यवस्था असू शकते; परंतु वृद्धाश्रम हा आई-वडिलांच्या प्रेमाची जागा घेऊ शकत नाही. शासनाने ज्येष्ठ नागरिकांसाठी आरोग्यसेवा, समुपदेशन, सुरक्षित निवास, कायदेशीर मदत आणि सामाजिक सहभागाच्या सुविधा अधिक सक्षम करण्याची गरज आहे. याचबरोबर वृद्ध आई-वडिलांनीही बदलत्या परिस्थितीचा स्वीकार करणे आवश्यक आहे. मुलांच्या संसारात अनावश्यक हस्तक्षेप न करता संवादातून नाती जपणे, आर्थिक नियोजन करणे आणि स्वतःच्या आरोग्याकडे लक्ष देणे गरजेचे आहे. नात्यांमध्ये अपेक्षा असतातच; पण अपेक्षांचे ओझे नात्यांवर पडू नये, याची काळजी दोन्ही पिढ्यांनी घेतली पाहिजे. कायदा वृद्ध आई-वडिलांच्या पालनपोषणाची जबाबदारी मुलांवर टाकू शकतो; परंतु कायदा प्रेम निर्माण करू शकत नाही. न्यायालय आदेश देऊ शकते, आर्थिक मदत मिळवून देऊ शकते; पण मुलाने आईच्या डोक्यावरून हात फिरवावा किंवा वडिलांच्या शेजारी बसून त्यांच्या जुन्या आठवणी ऐकाव्यात, यासाठी कोणताही कायदा पुरेसा नाही. ही जाणीव संस्कारातूनच निर्माण होते. आजच्या पिढीने एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे- आपण आपल्या मुलांकडून ज्या वागणुकीची अपेक्षा करतो, त्याची सुरुवात आपल्या आई-वडिलांपासूनच होते. आपण वृद्ध आई-वडिलांशी कसे वागतो, हेच उद्या आपली मुले पाहणार आहेत. संस्कार हे भाषणातून नव्हे, तर कृतीतून पुढे जातात. वृद्धापकाळ हा आयुष्याचा शेवटचा टप्पा असला, तरी तो एकाकीपणाचा टप्पा असण्याची गरज नाही. ज्या हातांनी आपले बालपण धरून ठेवले, त्या हातांना वृद्धापकाळात आधार देणे ही आपली नैतिक जबाबदारी आहे. आई-वडिलांना मोठ्या सुविधा देणे चांगलेच; पण त्यापेक्षा महत्त्वाचे आहे त्यांना आपल्या आयुष्यात स्थान देणे.

# सिद्धकलेचा कलाधिपती श्री गणरायाच्या चरणी समुद्रमंथनाचा देखणा आविष्कार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - रोजी गणेश चतुर्थीच्या मंगलदिनी सिद्धकला आयुर्वेद महाविद्यालयात श्री गणपतीची विधिवत स्थापना करण्यात आली. चौसष्ट कलांचा अधिपती आणि चौदा विद्यांचा व ज्ञानाचा देवता असलेल्या गणरायाच्या आगमनानिमित्त महाविद्यालयात विविध धार्मिक व सांस्कृतिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

यंदाच्या गणेशोत्सवात विद्यार्थ्यांनी साकारलेला 'समुद्रमंथन'चा देखावा विशेष लक्षवेधी ठरला आहे. भारताला लाभलेल्या प्राचीन चिकित्सकीय ज्ञानाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या आयुर्वेदाची देवता भगवान धन्वंतरी यांची उत्पत्ती ज्या समुद्रमंथनातून झाली, त्या पौराणिक प्रसंगाचे अत्यंत कल्पक आणि कलात्मक सादरीकरण विद्यार्थ्यांनी केले आहे.

या देखाव्यात भगवान विष्णूंच्या कूर्म अवतारावर श्री गणपतीची स्थापना करण्यात आली असून, त्यामागे भव्य मंदार पर्वत उभारण्यात आला आहे. मंदार पर्वताभोवती वासुकी नागाचे वेटोळे दाखवण्यात आले असून, नागाच्या मुखाच्या बाजूला दानव तर शेपटीच्या बाजूला देव उभे राहून समुद्रमंथन करीत असल्याचे जिवंत चित्र उभे करण्यात आले आहे.

समुद्रमंथनातून प्रकट झालेली चौदा रत्ने देखील या देखाव्यात कलात्मक पद्धतीने साकारण्यात आली आहेत. विशेषतः भगवान धन्वंतरींचे प्राकट्य आणि त्यांच्याशी संबंधित आयुर्वेदिक परंपरेचा संदर्भ या संपूर्ण देखाव्याला महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वातावरणाशी जोडतो.

पौराणिक कथा, भारतीय संस्कृती आणि आयुर्वेदाचे ज्ञान यांचा सुरेख संगम घडवून आणणारा हा देखावा विद्यार्थ्यांच्या सर्जनशीलतेचे दर्शन घडवित आहे. गणेशोत्सवाच्या निमित्ताने केवळ धार्मिक श्रद्धा जोपासण्याबरोबरच भारतीय ज्ञानपरंपरा आणि आयुर्वेदाचा वारसा नव्या पिढीपर्यंत पोहोचविण्याचा संदेशही या उपक्रमातून देण्यात आला आहे.


## स्टोन क्रशर उद्योगासाठी पाहिजेत

**अकाऊंटंट मॅनेजर**
अकाऊंटस व फायनान्स क्षेत्रातील अनुभव असलेले उमेदवारास प्राधान्य
Tally, GST, Accounting, MIS Report चे ज्ञान आवश्यक
टिम हाताळण्याची क्षमता असावी
पगार - २०,००० ते २५,००० प्रति महिना (अनुभवानुसार आकर्षक वेतन)
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा
पत्ता : स्टोनेक्स सेल्स अँड रिफॉर्म्स, धुळवड, ता. सिन्नर
- संपर्क - सांगळे साहेब - 9850194463 9503947084


### तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com | दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ मृत्यू नोंद/६३६/२०२६ | दिनांक - १५/०९/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. राहुल दत्तात्रय माळवे रा. घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ०७/०९/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची वडील नामे **दत्तात्रय एकनाथ माळवे** यांचा **मृत्यू मौजे घुलेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०४/१०/२०२४** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **मृत्यू** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी घुलेवाडी यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी घुलेवाडी यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन १५ दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

संगमनेर मेडिकल फाऊंडेशन रसर्च इन्स्टिट्यूट संचिलत

## वामनराव इथापे नर्सिंग कॉलेज

मु. वेल्हाळे , पो. राजापूर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर मो न. ८८८८६६१९६१.
Email : ithapenursing@gmail.com | Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik

**प्रथम वर्ष पोस्ट बेसिक बी. एस. सी. निर्सिंग (P.B.B.Sc Nursing)**
**शैक्षणिक वर्ष २०२६-२०२७ प्रवेश सूचना**

| Course | Available Seat | SC | ST | VJ(A) | NT-B | NT-C | NT-D | OBC | EWS | SEBC | OPEN | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| P.B.B.Sc | 40 | 03 | 01 | 01 | 00 | 01 | 00 | 04 | 04 | 04 | 22 | 40 |

**शैक्षणीक पात्रता :- जी.एन.एम. पास व महाराष्ट्र नर्सिंग कौन्सिल नोंदणी प्रमाणपत्र, शारीरिक तंदुरुस्ती प्रमाण पत्र.**
**अर्ज वितरण व स्वीकारण्याची अंतिम तारीख १९/०९/२०२६ ते २३/०९/२०२६**
**गुणवत्ता यादी २४/०९/२०२६ रोजी लिस्ट नोटीस बोर्डवर प्रदर्शित करण्यात येईल.**
**महाविद्यालय रुजू आणि अंतिम प्रवेश दिनांक २५/०९/२०२६**
**टीप : मूळ कागदपत्रे सोबत आणावी.**

**अध्यक्ष** **प्राचार्या**

SANGAMNER MEDICAL FOUNDATION AND RESEARCH INSTITUTE

## VAMANRAO ITHAPE NURSING COLLEGE, SANGAMNER

Affiliated to Maharashtra University of Health Sciences, Nashik
ADDRESS : VELHALE, TAL. SANGAMNER, DIST. AHILYANAGAR
Email : ithapenursing@gmail.com Mo. No. 9730228099, 8888261961

**ADMISSION NOTICE FOR A.Y. 2026-27**
**M.Sc. Nursing (2Year). P.G. Course**

Applications are invited from eligible candidates for admission to M.Sc. Nursing Course for the academic year 2026-27 in the prescribed format

| SPECIALITY | SC | ST | VJ(A) | NT-B | NT-C | NT-D | OBC | SEBC | EWS | OPEN | NRI | Total |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Medical Surgical Nursing | - | - | - | - | - | 01 | 01 | 01 | - | 02 | - | 05 |
| Child Health Nursing | 01 | - | - | - | - | - | - | - | 01 | 02 | 01 | 05 |
| Mental Health Nursing | - | - | - | - | - | - | 01 | 01 | | 02 | 01 | 05 |
| Obstetric & Gynecological Nursing | 01 | | | | | | | | 01 | 02 | 01 | 05 |
| Community Health Nursing | - | 01 | - | - | - | - | - | 01 | - | 02 | 01 | 05 |
| Total | 02 | 01 | - | - | - | 01 | 02 | 03 | 02 | 10 | 04 | 25 |

**Eligibility**
1) Passed Basic B.Sc./P.B.B.Sc./B.Sc. Nursing Marks – 55% and above
2) Clinical experience / teaching experience for one year and above after registration
3) Registration with concerned state council mandatory.
4) Age below 55 years.
5) Candidate should be medically fit.

**SCHEDULE CAP – 1**

| | |
|---|---|
| Date of submission of Application form | 18/09/2026 TO 21/09/2026 |
| Publication of Provisional Selection List/Merit | 22/09/2026 |
| List/Rejected List (Speciality Wise) | 22/09/2026 |
| Cut off Date Admission | 30/09/2026 |

Note : 1) Working hrs. 9am to 5 pm 2) Selection of candidates is purely on merit basis.
3) If no suitable candidate applied or available in respective category such vacant seat shall be given to another candidate as against category.

**President** **Principal.**

### ग्रामपंचायत हंगेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर

**बी–१ निविदा सुचना**

ग्रामपंचायत हंगेवाडी, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर यांचे मार्फत योग्य त्या जिल्हा परिषद ठेकेदार अंतर्गत नोंदणीकृत मक्तेदाराकडून लिफाफा पध्दतीने खालील कामांच्या निविदा मागवीत आहेत. निविदेचा कोरा नमूना व भरलेली निविदा स्वीकारण्याचा कालावधी दि. १८/०९/२०२६ रोजी सकाळी १०.०० वाजले पासून ते दि. २४/०९/२०२६ सकाळी १०.०० वाजेपर्यंत शासकिय सुट्टी वगळून व कार्यालयीन वेळेत ग्रामपंचायत कार्यालयात उपलब्ध आहे. तसेच दि. २५/०९/२०२६ रोजी दुपारी ११.०० वा नंतर निविदा उघडण्यात येतील.

| अ. क्र. | निविदेचे नाव | लेखाशिर्ष | निविदा रक्कम | बयाणा रक्कम | निविदा फी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे हंगेवाडी येथे पाऊस पाणी संकलन करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ | ८१५९९.०० | ८१६ | २३६ | खुला |
| २. | मौजे हंगेवाडी येथे नवीन स्लुइस व्हॉल्व टाकने व चेंबर बांधने | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ | १०४८४२.०० | १०४९ | २३६ | खुला |
| ३. | मौजे हंगेवाडी येथे जि. प. शाळेसाठी कलामंच बांधणे | १५ वा वित्त आयोग सन २०२५-२६ | १६००३१.०० | १६०० | २३६ | खुला |
| ४. | मौजे हंगेवाडी येथे जि. प. शाळेसाठी पत्रा शेड करणे | १५ वा वित्त आयोग सन २०२४-२५ | ८४१३७.०० | ८४२ | २३६ | खुला |
| ५. | मौजे हंगेवाडी येथे हनुमान मंदिरा जवळील संरक्षक भिंत दुरूस्ती करणे | ग्रामनिधी | १२२६८३.०० | १२२७ | २३६ | खुला |

अटी व शर्ती – १) निविदा या तांत्रिक लिफाफा व्यापारी लिफाफा या दोन लिफाफा पच्दीतीने सादर करावयाच्या आहेत. २) निविदा अटी व शतीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदा मधिल एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारण्याचा हक्क निम्नस्वाक्षरीने ग्रामपंचायतीने राखून ठेवले आहेत. ३) लिफाफाक्र १ शक्यतो निविदेमधील नमूद कालावधी व वेळेत संबंधित ग्रामपंचायत कार्यालयात उघडण्यात येईल. ४) सदर निविदा उघडताना मक्तेदार उपस्थित नसले तरीही नियोजित वेळेत निविदा उघडण्यात येतील.

**ग्रामपंचायत अधिकारी सरपंच**
**ग्रा.पं. हंगेवाडी, ता. संगमनेर, जि. अ.नगर**


दैनिक युवावार्ता

## पाहिजेत

रिसेप्शनिस्ट - २ जागा
डाटा एन्ट्री ऑपरेटर - २ जागा
ओ. टी. टेक्निशियन - २ जागा
डायलिसिस टेक्निशियन - २ जागा
वॉर्ड मॅनेजर - १ जागा
नर्सिंग सुपरवाईझर - २ जागा
नाईट, मॉर्निंग, इव्हीनींग
**कुटे हॉस्पिटल**
ताजणे मळा, नविन नगररोड, संगमनेर,
8888882225
9766855593

## आकर्षक पगारावर जागा भरणे आहे

**सुपरवायझर**
पूर्णवेळ [पुरुष] : ०२ पदे
शैक्षणिक पात्रता: १२वी / आयटीआय उत्तीर्ण
(स्वतःची टु व्हिलर असणे अवश्यक)
**ऑफिस असिस्टंट**
अर्धवेळ [पुरुष / महिला]
शैक्षणिक पात्रता: १०वी / १२वी उत्तीर्ण
- संपर्क -
**उमंग इन्फ्राटेक**
7875455777

## जाहीरात छोटी प्रतिसाद मोठा

## पाहिजेत

तरूणांसाठी सुवर्णसंधी
**राजवीर फार्मा**
मेडीकल एजन्सी कामाकरिता फक्त होतकरू, तरूणांनी संपर्क साधावा
पुरूष – ४ जागा
(वय- १८ ते ४०)
रविवार सुट्टी असते
आकर्षक पगार व बोनस
ठिकाण– जाणता राजा रोड, मुथुट फायनान्स पाठीमागे,२ नं गल्ली, संगमनेर
8669184141

## पाहिजेत

**रिषभ गोल्ड अँण्ड डायमंड**
सल्समन - २
ड्रायव्हर - १
वॉचमेन - १
ठिकाण - मेनरोड, साईनाथ चौक, संगमनेर
9604334777
8669888777

## पाहिजेत

कॉम्प्युटर ऑपरेटर - ४
अकाऊंटंट - २
सेल्समन - ५
(इन्सेंटीव्ह दिला जाईल)
आकर्षक पगार दिले जाईल
9822097904
9404971697
भेटण्याची वेळ (सायं ४ ते ७)









## जागा विकणे आहे

अतिशय उत्तम लोकेशन
तहसील NA असलेली अर्धा गुंठा जागा त्वरीत विकणे आहे
(दोन्ही बाजूने रस्ता)
पत्ता - कचेरी रोड, श्रमिक कॉम्पलेक्स (गोडावून) जवळ, अकोले , जि. अ.नगर
- संपर्क -
7385653323

## भाड्याने देणे आहे

सर्व सुविधायुक्त
०१ बीएचके
रो - हाऊस
भाड्याने देणे आहे
सुकेवाडी रोड, संगमनेर
8282825818

## जागा विकणे आहे

अतिशय उत्तम लोकेशन मधील मालदाड रोड, स्टेट बँक कॉलनी लगतची तहसील N. A. व सरकारी मोजीणी झालेली २ गुंठे उत्तरमुखी रहिवाशी चौरस जागा विकणे आहे.
एजंट स्वागत
- संपर्क -
9890468212

## पाहिजेत

स्पेशल सिक्युरिटी फोर्स व बाऊन्सर सर्विसेस
सिक्युरिटी गार्ड - ५
सफाई कर्मचारी - ५
हेल्पर - ५
पार्ट टाइम /फुल टाइम काम मिळेल ( सेक्युरिटी गार्ड
संपर्क - तिरंगा चौक, मालदाड रोड, संगमनेर
7709828846

# लोकसंवाद-२०२६ अंतर्गत 'श्री गणेशा आरोग्याचा' अभियान

## आयुष्मान भारत व महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन




युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - 'गणेशोत्सव' हा महाराष्ट्रातील लोकसहभागाचा मोठा उत्सव असून राज्य शासनाने या उत्सवाला 'राज्य महोत्सव' म्हणून घोषित केले आहे. गणेशोत्सवाच्या काळात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळे तसेच गावागावांत होणाऱ्या जनसमुदायाच्या उपस्थितीचा प्रभावी उपयोग करून शासनाचे धोरणात्मक निर्णय, विविध कल्याणकारी योजना आणि जनहिताच्या उपक्रमांची माहिती समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासाठी राज्यभरात 'लोकसंवाद-२०२६' हा विशेष जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहे.

या उपक्रमांतर्गत जिल्हा माहिती कार्यालय, मुख्यमंत्री सहायता निधी व धर्मादाय रुग्णालय मदत कक्ष आणि सार्वजनिक गणेशोत्सव मंडळ यांच्या समन्वयाने 'श्री गणेशा आरोग्याचा' आरोग्य अभियान-२०२६ अंतर्गत अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेज येथे मार्गदर्शनपर व्याख्यान तसेच मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले. यावेळी जिल्हा समन्वयक रोहित कारंडे यांनी आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना याबाबत उपस्थितांना सविस्तर माहिती दिली. जिल्ह्यातील सुमारे ५२ टक्के नागरिकांनी आयुष्मान कार्ड काढले असून उर्वरित पात्र नागरिकांनीही आयुष्मान कार्ड तसेच वय वंदना कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन त्यांनी केले. या योजनांच्या माध्यमातून पात्र लाभार्थ्यांना ५ लाख रुपयांपर्यंतच्या आरोग्य उपचाराचा लाभ मिळू शकतो, अशी माहिती त्यांनी दिली.

अहिल्यानगर जिल्ह्यात या योजनेअंतर्गत १०७ खासगी रुग्णालये अंगीकृत असल्याचेही श्री. कारंडे यांनी सांगितले. त्यामुळे पात्र नागरिकांनी योजनांची माहिती घेऊन आवश्यक कागदपत्रांसह कार्ड काढून घ्यावे आणि उपलब्ध आरोग्य सुविधांचा लाभ घ्यावा, असे त्यांनी स्पष्ट केले. जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत यांनी 'लोकसंवाद-२०२६' या उपक्रमाचा उद्देश आणि त्याअंतर्गत राबविण्यात येणाऱ्या जनजागृती उपक्रमांची माहिती दिली. शासनाच्या विविध योजना व निर्णयांची माहिती नागरिकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्यासाठी गणेशोत्सवाच्या माध्यमातून होणारा लोकसहभाग महत्त्वाचा ठरत असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी आयोजित मोफत आरोग्य शिबिराचा उपस्थित नागरिकांनी लाभ घेतला. कार्यक्रमास अहमदनगर होमिओपॅथिक कॉलेजचे अध्यक्ष डॉ. भूषण अनभुले, जिल्हा माहिती अधिकारी मुकुंद चिलवंत, प्राचार्य डॉ. पवार, जिल्हा समन्वयक डॉ. स्वप्नील तुपे यांच्यासह संबंधित अधिकारी, पदाधिकारी, वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिनिधी व नागरिक उपस्थित होते.

# सप्टेंबर अखेरीस पुन्हा पावसाचा धुमाकूळ



युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राज्यात पावसाने पुन्हा जोर पकडण्याची शक्यता निर्माण झाली असून, सप्टेंबर महिन्याच्या अखेरीस पावसाचा धुमाकूळ पाहायला मिळण्याची शक्यता आहे. हवामान विभागाच्या विस्तारित अंदाजानुसार २१ ते २८ सप्टेंबरदरम्यान राज्याच्या मध्यवर्ती भागात पावसाचा जोर वाढण्याची शक्यता आहे. मुंबई, कोकण विभाग तसेच घाटमाथ्यावरही पावसाच्या सरींचा जोर राहण्याचा अंदाज व्यक्त करण्यात आला आहे.

दरम्यान, भारतीय हवामान विभागाच्या १७ सप्टेंबरच्या विस्तारित अंदाजानुसार १९ सप्टेंबरच्या आसपास अंदमान समुद्र आणि लगतच्या परिसरात कमी दाबाचे क्षेत्र तयार होण्याची शक्यता आहे. या हवामान प्रणालीच्या पुढील वाटचालीनुसार राज्यातील पावसाच्या स्थितीत बदल होण्याची शक्यता आहे.

सप्टेंबरच्या अखेरीस सक्रिय होणारा पाऊस अनेक भागांत जोरदार सरींच्या स्वरूपात बरसण्याची शक्यता आहे. त्यामुळे हा पाऊस परतीच्या पावसासारखा जोरदार ठरणार का, याकडे शेतकरी आणि नागरिकांचे लक्ष लागले आहे. मात्र, पावसाची तीव्रता आणि नेमका कोणता भाग अधिक प्रभावित होईल, याबाबतचे अंदाज पुढील दिवसांत अधिक स्पष्ट होणार आहेत.

सध्या राज्यातील अनेक भागांत खरीप पिके काढणीच्या टप्प्यात आहेत. त्यामुळे सप्टेंबरअखेरीस जोरदार पाऊस झाल्यास शेतीकामांवर त्याचा परिणाम होऊ शकतो. दुसरीकडे, पावसाची प्रतीक्षा असलेल्या भागांना या पावसामुळे काहीसा दिलासा मिळण्याची शक्यता आहे.

हवामान विभागाकडून पुढील काही दिवसांत जिल्हानिहाय आणि दिवसनिहाय पावसाचे अंदाज व इशारे अधिक स्पष्ट केले जाणार आहेत. त्यामुळे नागरिकांसह शेतकऱ्यांनी हवामान विभागाच्या ताज्या सूचनांकडे लक्ष ठेवणे आवश्यक आहे.

# 'निठारी'चा आरोपी सुरेंद्र कोलीने घेतली फाशी



हरीद्वार (वृत्तसंस्था)

निठारी हत्याकांडातील आरोपी सुरेंद्र कोलीने शुक्रवारी हरिद्वारमध्ये फाशी घेऊन आत्महत्या केली. ही घटना उत्तर हरिद्वारमधील भूपतवाला येथे घडल्याचे सांगितले जात आहे. तब्बल १९ वर्षे तुरुंगात राहिल्यानंतर नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या प्रकरणातही त्याची निर्दोष सुटका केली होती. त्यानंतर तो तुरुंगाबाहेर आला होता.

नोएडातील निठारी येथे २००५-०६ मध्ये मुले आणि महिला बेपत्ता झाल्यानंतर कोलीचे नाव समोर आले होते. २९ डिसेंबर २००६ रोजी त्याच्या कोठीमागील नाल्यात मानवी अवशेष सापडल्यानंतर देशभरात खळबळ उडाली होती. त्यानंतर सीबीआयने तपास केला आणि कोलीवर अनेक प्रकरणांमध्ये खटले चालवण्यात आले. एकेकाळी त्याला १३ प्रकरणांमध्ये मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली होती. मात्र, २०२३ मध्ये अलाहाबाद उच्च न्यायालयाने १२ प्रकरणांत त्याची निर्दोष मुक्तता केली. नोव्हेंबर २०२५ मध्ये सर्वोच्च न्यायालयाने शेवटच्या प्रकरणातही त्याला दोषमुक्त केले होते.सुरेंद्र गेल्या काही महिन्यांपासून हरिद्वारमध्ये एकटाच राहत होता. शेजाऱ्यांच्या म्हणण्यानुसार, त्याने चार दिवसांपूर्वीच रस्त्याच्या कडेला एक छोटे दुकान भाड्याने घेतले होते. तिथे तो चहा विकू लागला होता. दुकानासाठी त्याने मालकाला काही महिन्यांचे आगाऊ भाडेही दिले होते.

शेजाऱ्यांचे म्हणणे आहे की, सध्या या भागात कुंभमेळ्याच्या तयारीच्या पार्श्वभूमीवर अतिक्रमण हटवण्याची मोहीम सुरू आहे. अशा परिस्थितीत कोलीला आपले नवीन दुकान हटवले जाण्याची भीती होती. दुकान हातातून जाणे आणि आगाऊ रक्कम अडकण्याच्या चिंतेमुळे त्याने हे पाऊल उचलले असावे, असे त्यांना वाटते. मात्र, पोलीस अद्याप आत्महत्येच्या कारणाचा तपास करत आहेत.२००५-०६ मध्ये नोएडाच्या निठारी परिसरातून मुले आणि महिला गायब होऊ लागल्या. या प्रकरणांची चौकशी करताना पोलिस २९ डिसेंबर २००६ रोजी सेक्टर-३१ मधील व्यावसायिक मोनिंदर सिंह पंढेर यांच्या D-5 क्रमांकाच्या कोठीपर्यंत पोहोचले. कोठीच्या मागील नाल्यातून आणि आजूबाजूच्या परिसरातून अनेक मानवी कवट्या, हाडे, कपडे आणि इतर वस्तू सापडल्या. त्यानंतर पंढेर आणि त्याचा घरगुती नोकर सुरेंद्र कोली याला अटक करण्यात आली.

प्रकरणाची चौकशी जानेवारी २००७ मध्ये उइखकडे सोपवण्यात आली. पोलिसांनी बेपत्ता होणे/गुन्ह्यांशी संबंधित १९ स्वतंत्र FIR दाखल केले.

# अकोल्यात दहा हजाराचा गुटखा जप्त

## चार जणांना अटक



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - शहरात अन्न व औषध प्रशासन विभागाने गुरुवारी अचानक छापा टाकून शहरातील चार पानटपऱ्यांवर कारवाई करीत १० हजार रुपयाचा गुटखा व पान मसाला जप्त केला. या प्रकरणी एक पुरवठादारासह पाच जणांवर अकोले पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला असून चार जणांना अटक केली.

अकोले तालुक्यात खुलेआम गुटखा विक्री होत आहे. याबाबत माध्यमातून बातमी प्रसिद्ध केल्यानंतर अन्न व औषध प्रशासनाला जाग आली. माध्यमातील बातमीची दखल घेत विभागाने गुरुवारी सकाळी अकोले शहरातील पान टपऱ्यांवर छापा टाकला. यावेळी बसस्थानक परिसरातील गुलकंद पान स्टॉलचे अबुजर बागवान, वर्षा पान स्टॉलचे अभिजित नाईकवाडी, अगस्ती कोल्ड्रिंकचे नंदकुमार गायकवाड, साई पान स्टॉलचे रोहिदास आंबरे अशा चार टपऱ्यामध्ये विविध

कंपनीचा गुटखा व पानमसाला विक्री करण्यासाठी ठेवल्याचे आढळून आले, असा १० हजार रुपयाचा मुद्देमाल आहे. दुकानदाराकडे अधिक चौकशी केली असता त्यांना तांबोळी याच्याकडून पुरवठा झाल्याचे सांगितले. त्यानुसार अन्न व औषध प्रशासनाच्या फिर्यादीवरून पाच जणांवर अन्न सुरक्षा मानके कायदा कलम ५९ अन्वये गुन्हा दाखल करण्याचे काम उशीरापर्यंत सुरु होते. ही कारवाई अन्न सुरक्षा अधिकारी डॉ. प्रदीप पवार, उमेश सूर्यवंशी, सहाय्यक आयुक्त सोपान इंगळे, नमुना सहाय्यक प्रसाद कसबेकर यांनी केली.

## दिनविशेष

१९७८: संयुक्त राष्ट्र — सॉलोमन बेटे संयुक्त राष्ट्रात सामील झाले.
१९७०: ग्लास्टनबरी फेस्टिव्हल — मायकेल इव्हिस यांनी पहिल्यांदा आयोजित केला.
१९५७: प्लंबबॉब रेनियर अणुबॉम्ब — हा पहिला आण्विक स्फोट बनला जो संपूर्णपणे भूगर्भात समाविष्ट होता, त्यांचा कोणताही परिणाम झाला नाही.
१९५०: कोरियन युद्ध — नाम नदीची लढाई: उत्तर कोरियाच्या सैन्याने केलेला हल्ला परतवून लावला.
१९४६: युरोप कौन्सिल — स्थापना झाली.
१९४४: दुसरे महायुद्ध — हर्टगेन फॉरेस्टची लढाई: सुरू झाली. पुढे अमेरिकन सैन्याने लढलेली ही सर्वात मोठी वैयक्तिक लढाई ठरेल.
१९४४: दुसरे महायुद्ध — मॉस्को युद्धविराम करार: फिनलंड आणि सोव्हिएत युनियन यांच्यात करारावर स्वाक्षरी झाली.
१८९३: न्यूझीलंड — देशामध्ये महिलांना मतदानाचा हक्क मिळाला.

## जन्म

१९४०: पिनाकी चौधरी — भारतीय चित्रपट दिग्दर्शक (निधन: २४ ऑक्टोबर २०२२ )
१९२५: बाबूराव गोखले — नाटककार (निधन: २८ जुलै १९८१ )
१९१७: अनंतराव कुलकर्णी — कॉन्टिनेन्टल प्रकाशनचे संस्थापक (निधन: ६ नोव्हेंबर १९९८ )
१९१२: रुबेन डेव्हीड — भारतीय पशुवैद्य आणि प्राणीसंग्रहालय संस्थापक — पद्मश्री (निधन: २४ मार्च १९८९ )
१९११: विल्यम गोल्डिंग — इंग्लिश लेखक — नोबेल पारितोषिक (निधन: १९ जून १९९३ )
१८६७: पंडित श्रीपाद दामोदर सातवळेकर — चित्रकार, संस्कृत पंडित (निधन: ३१ जुलै १९६८ )
१८३९: जॉर्ज कॅडबरी — कॅडबरीचे संस्थापक (निधन: २४ ऑक्टोबर १९२२ )
१५५१: हेन्री (३रा) — फ्रान्सचा राजा (निधन: २ ऑगस्ट १५८९ )
१९६५: सुनिता विल्यम — भारतीय-अमेरिकन अंतराळवीर आणि अमेरिकन नौदल अधिकारी, दीर्घ अंतराळ मोहिमांसाठी प्रसिद्ध

## मृत्यू

१९९२: ना. रा. शेंडे — साहित्यिक, विदर्भ साहित्य संघाचे अध्यक्ष
१९८७: एनर गेरहर्देसन — नॉर्वे देशाचे पहिले पंतप्रधान (जन्म: १० मे १८९७ )
१९६३: सर डेव्हिड लो — जगप्रसिद्ध व्यंगचित्रकार (जन्म: ७ एप्रिल १८९१ )
१९४४: गाय गिब्सन — अँग्लो-इंडियन कमांडर आणि पायलट — व्हिक्टोरिया क्रॉस (जन्म: १२ ऑगस्ट १९१८ )
१९३६: विष्णू नारायण भातखंडे — भारतीय गायक आणि संगीततज्ज्ञ (जन्म: १० ऑगस्ट १८६० )
१९३६: पं. विष्णू नारायण भातखंडे — संगीतशास्त्रकार, गांधर्व महाविद्यालयाचे सहसंस्थापक (जन्म: १० ऑगस्ट १८६० )
१९२५: सर फ्रान्सिस डार्विन — इंग्लिश वनस्पती वैज्ञानिक
१८८१: जेम्स गारफील्ड — अमेरिकेचे २०वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: १९ नोव्हेंबर १८३१ )
१७२६: खंडो बल्लाळ चिटणीस — छत्रपती संभाजी वव छत्रपती राजारामस्वीय सहाय्यक
१७१०: ओले रोमर — डॅनिश खगोलशास्त्रज्ञ
११२३: Emperor Taizu of Jin — चिनी सम्राट (जन्म: १ ऑगस्ट १०६८ )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१८ सप्टेंबर**

## मॉस्को युद्धविराम करार — फिनलंड आणि सोव्हिएत युनियनमधील संघर्षाला निर्णायक वळण

१९४४ मधील मॉस्को युद्धविराम करार हा दुसऱ्या महायुद्धाच्या इतिहासातील एक महत्त्वाचा टप्पा मानला जातो. १९ सप्टेंबर १९४४ रोजी फिनलंड आणि सोव्हिएत युनियन यांच्यात या करारावर स्वाक्षरी झाली. या करारामुळे फिनलंड आणि सोव्हिएत युनियन यांच्यात सुरू असलेल्या **'कंटिन्युएशन वॉर'**ला निर्णायक वळण मिळाले आणि फिनलंडने युद्धातून माघार घेण्याची प्रक्रिया सुरू केली.दुसऱ्या महायुद्धाच्या सुरुवातीला सोव्हिएत युनियन आणि फिनलंड यांच्यात १९३९-४० मध्ये विंटर वॉर झाले होते. या युद्धानंतर फिनलंडला काही भूभाग सोव्हिएत युनियनला द्यावा लागला. मात्र १९४१ मध्ये जर्मनीने सोव्हिएत युनियनवर आक्रमण केल्यानंतर फिनलंडने सोव्हिएतविरोधी युद्धात जर्मनीच्या बाजूने सहभाग घेतला. या संघर्षाला 'कंटिन्युएशन वॉर' असे संबोधले जाते.१९४४ मध्ये युद्धाची दिशा मोठ्या प्रमाणात बदलली. सोव्हिएत लाल सैन्याने पूर्व आघाडीवर मोठी प्रगती केली. फिनलंडवर लष्करी दबाव वाढत गेला. देशातील नेतृत्वाला युद्ध सुरू ठेवणे अत्यंत कठीण होत असल्याचे जाणवू लागले. त्यामुळे सोव्हिएत युनियनशी युद्धविरामासाठी चर्चा सुरू करण्यात आली.१९ सप्टेंबर १९४४ रोजी मॉस्को येथे युद्धविराम करार झाला. या करारानुसार फिनलंडने सोव्हिएत युनियनविरुद्धची लष्करी कारवाई थांबवण्याचे मान्य केले. तसेच पूर्वीच्या काही प्रादेशिक नुकसानीची पुष्टी करण्यात आली आणि फिनलंडला सोव्हिएत युनियनला नुकसानभरपाई देण्याच्या अटी स्वीकाराव्या लागल्या. करारातील महत्त्वाच्या अटींपैकी एक म्हणजे फिनलंडने आपल्या भूमीवर असलेल्या जर्मन सैन्याला बाहेर काढणे.ही शेवटची अट अत्यंत महत्त्वाची ठरली. कारण फिनलंडमध्ये त्या वेळी मोठ्या प्रमाणात जर्मन सैन्य उपस्थित होते. फिनलंडने जर्मन सैन्याला देशाबाहेर जाण्यास सांगितल्यानंतर जर्मनी आणि फिनलंड यांच्यात संघर्ष निर्माण झाला. यामुळे पुढे लॅपलँड वॉर सुरू झाले. या युद्धात फिनिश सैन्याने जर्मन सैन्याला उत्तरेकडील फिनलंडमधून बाहेर ढकलले.मॉस्को युद्धविरामामुळे फिनलंडला दुसऱ्या महायुद्धातील सक्रिय संघर्षातून बाहेर पडण्याचा मार्ग मिळाला. मात्र त्यासाठी फिनलंडला मोठ्या आर्थिक आणि प्रादेशिक किंमतीला सामोरे जावे लागले. हजारो नागरिकांचे विस्थापन झाले आणि देशाच्या अर्थव्यवस्थेवर युद्धाचा मोठा परिणाम झाला.या करारानंतर फिनलंडने युद्धोत्तर काळात आपले परराष्ट्र धोरण नव्याने आखले. सोव्हिएत युनियनशी थेट संघर्ष टाळत स्वतंत्र राष्ट्र म्हणून आपली राजकीय आणि आर्थिक व्यवस्था टिकवून ठेवण्याचा प्रयत्न फिनलंडने केला.मॉस्को युद्धविराम कराराचे महत्त्व केवळ फिनलंड आणि सोव्हिएत युनियनपुरते मर्यादित नव्हते. दुसऱ्या महायुद्धाच्या अंतिम टप्प्यात पूर्व युरोपातील राजकीय परिस्थिती बदलत असताना या कराराने फिनलंडला युद्धातून बाहेर पडण्याची संधी दिली. १९ सप्टेंबर १९४४ हा दिवस त्यामुळे फिनलंडच्या आधुनिक इतिहासातील एक निर्णायक दिवस मानला जातो.

## सुनीता विल्यम्स : अंतराळाला गवसणी घालणारी भारतीय कन्या

**जन्मदिन विशेष**

सुनीता लिन विल्यम्स या भारतीय वंशाच्या प्रसिद्ध अमेरिकन अंतराळवीर, अमेरिकन नौदलाच्या माजी अधिकारी आणि अंतराळ संशोधन क्षेत्रातील प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व आहेत. त्यांचा जन्म १९ सप्टेंबर १९६५ रोजी अमेरिकेतील ओहायो राज्यातील युक्लिड येथे झाला. त्यांचे वडील डॉ. दीपक पांड्या हे भारतातून अमेरिकेत स्थायिक झालेले न्यूरोॲनाटॉमिस्ट होते, तर आई बोनी पांड्या या अमेरिकन वंशाच्या होत्या. भारतीय संस्कृतीशी असलेले त्यांचे नाते आणि अंतराळातील उल्लेखनीय कामगिरी यामुळे त्या भारतातही विशेष लोकप्रिय आहेत.सुनीता विल्यम्स यांनी अमेरिकन नौदलात प्रवेश घेतल्यानंतर हेलिकॉप्टर पायलट म्हणून प्रशिक्षण घेतले. त्यांनी नौदलातील सेवेदरम्यान विविध मोहिमा पार पाडल्या आणि ३० हून अधिक वेगवेगळ्या प्रकारच्या विमानांमध्ये उड्डाणाचा अनुभव मिळवला. त्यांच्या वैमानिक कौशल्यामुळे आणि तांत्रिक ज्ञानामुळे त्यांची पुढे नासा अर्थात **National Aeronautics and Space Administration (NASA)**च्या अंतराळवीर कार्यक्रमासाठी निवड झाली.१९९८ मध्ये त्यांची नासाच्या अंतराळवीर गटात निवड झाली. त्यानंतर त्यांनी कठोर प्रशिक्षण घेतले. अंतराळातील दीर्घकाळ वास्तव्य, स्पेसवॉक, रोबोटिक्स, वैज्ञानिक प्रयोग आणि आपत्कालीन परिस्थिती हाताळण्याचे प्रशिक्षण त्यांनी घेतले.डिसेंबर २००६ मध्ये 'डिस्कव्हरी' अंतराळयानातून सुनीता विल्यम्स यांनी पहिल्यांदा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकाकडे (ISS) प्रवास केला. त्यानंतर त्यांनी अंतराळात दीर्घकाळ वास्तव्य करत अनेक वैज्ञानिक प्रयोगांमध्ये सहभाग घेतला. त्यांच्या पहिल्या मोहिमेदरम्यान त्यांनी अनेक स्पेसवॉक केले. अंतराळात काम करताना त्यांनी महिलांसाठी तसेच तरुण विद्यार्थ्यांसाठी एक प्रेरणादायी आदर्श निर्माण केला.सुनीता विल्यम्स यांची २०१२ मध्ये पुन्हा आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर नियुक्ती झाली. या मोहिमेदरम्यान



त्यांनी अंतराळ स्थानकाच्या देखभाल-दुरुस्तीच्या कामात महत्त्वाची भूमिका बजावली. अंतराळातील त्यांच्या एकूण स्पेसवॉकच्या संख्येमुळे आणि कालावधीमुळे त्या महिला अंतराळवीरांमध्ये विशेष विक्रमांच्या यादीत पोहोचल्या.२०२४ मध्ये बोईंगच्या 'स्टारलाइनर' या मानवी अंतराळयानाच्या पहिल्या क्रूड चाचणी मोहिमेत सुनीता विल्यम्स यांनी पायलट म्हणून सहभाग घेतला. या मोहिमेचा उद्देश स्टारलाइनर यानाची मानवांसह अंतराळ प्रवास करण्याची क्षमता तपासणे हा होता. तांत्रिक अडचणींमुळे त्यांचे अंतराळ स्थानकावरील वास्तव्य अपेक्षेपेक्षा बरेच वाढले. या काळात त्यांनी आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावरील वैज्ञानिक आणि दैनंदिन कामांमध्ये सहभाग सुरू ठेवला.सुनीता विल्यम्स यांच्या कारकिर्दीत धैर्य, शिस्त, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि आव्हानांवर मात करण्याची क्षमता हे विशेष गुण दिसून येतात. भारतीय वंशाच्या व्यक्तीने अमेरिकन नौदलातून अंतराळवीर होऊन आंतरराष्ट्रीय अंतराळ स्थानकावर महत्त्वपूर्ण जबाबदाऱ्या पार पाडणे ही अभिमानाची बाब आहे.त्यांच्या जीवनप्रवासातून विद्यार्थ्यांना आणि तरुणांना विज्ञान, तंत्रज्ञान, अभियांत्रिकी आणि अंतराळ संशोधन क्षेत्रात करिअर करण्याची प्रेरणा मिळते.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
- कमी वेदना, जलद बरे होणे
- लेझर व प्रगत तंत्रज्ञान
- अनुभवी जज्ञ डॉक्टरांचा सल्ला
- गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक युवावार्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
परिवर्तनाचा पुरस्कर्ता

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९१६६०४
७६२०३८८२३०



# दुष्काळाच्या संकटात सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी - आ. खताळ

## नाशिक-पुणे रेल्वे संगमनेरमार्गेच जाण्याचा विश्वास



संगमनेर– दैनिक युवावार्ता कार्यालयात विराजमान असलेल्या गणरायाची आरती करताना आ. अमोल खताळ दिसत आहे. यावेळी आ. खताळ यांचा दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसन भाऊ हासे, संचालक आनंद हासे, कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर- अहिल्यानगर जिल्ह्यासह राज्यातील अनेक भागांत यंदा पावसाचे प्रमाण असमाधानकारक राहिल्याने दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण झाली आहे. संगमनेर विधानसभा मतदारसंघातही पावसाअभावी शेतातील पिके करपून गेली असून शेतकरी मोठ्या संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर प्रशासनाने शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पिकांचे तातडीने पंचनामे करावेत. या कठीण प्रसंगी आपण स्वतः तसेच सरकार शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, त्यांना आवश्यक ती शासकीय मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्नशील राहू, अशी ग्वाही आमदार अमोल खताळ यांनी दिली.

दैनिक युवावार्ता कार्यालयात विराजमान असलेल्या गणरायाची आरती शुक्रवारी सकाळी आमदार अमोल खताळ यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी दैनिक युवावार्ताचे संस्थापक किसनभाऊ हासे, संचालक आनंद हासे व कार्यकारी संपादक सुदीप हासे यांच्या हस्ते आमदार खताळ यांचा सत्कार करण्यात आला. त्यानंतर झालेल्या औपचारिक संवादात त्यांनी संगमनेर तालुक्याच्या विकासासंदर्भातील विविध संकल्पना व प्रलंबित प्रश्नांवर आपली भूमिका स्पष्ट केली.

आमदार खताळ म्हणाले की, संगमनेर तालुक्यातील अनेक रस्त्यांचे प्रश्न प्रलंबित आहेत. हे प्रश्न मार्गी लावण्यासाठी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्र्यांकडे निधीसाठी सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. यासोबतच ग्रामविकासाच्या दृष्टीने आगामी काळात मोठ्या प्रमाणावर काम करण्याचा मानस आहे.

**'मागील वर्षी पीकविम्यापासून शेतकरी वंचित राहिले'**- मागील वर्षी संगमनेर तालुक्यातील शेतकऱ्यांना पीकविमा मिळाला नाही. यामागे वेगळेच षड्यंत्र असल्याचा दावा आमदार खताळ यांनी केला. यंदा मात्र या विषयाकडे आपण बारकाईने लक्ष देणार असून शेतकऱ्यांना वेळेत शासकीय मदत तसेच पीकविम्याचा लाभ मिळावा, यासाठी आवश्यक तो पाठपुरावा करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

नाशिक-पुणे रेल्वे मार्गाबाबतही आमदार खताळ यांनी आशावाद व्यक्त केला. नाशिक-पुणे रेल्वे संगमनेरमार्गेच जाईल आणि काकोडकर समितीचा अहवालही त्याच दिशेने येईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

राजकीय विरोधकांच्या टीकेला आपण यापुढेही संयमाने आणि प्रत्यक्ष कामातून उत्तर देणार असल्याचे सांगत आमदार खताळ म्हणाले की, विरोधकांकडे अधिक लक्ष देण्यापेक्षा शहर व तालुक्यातील प्रलंबित प्रश्न सोडविणे हेच आपले प्राधान्य आहे. विकासकामांच्या माध्यमातून जनतेचा विश्वास सार्थ ठरविण्यावर आपला भर राहणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी जिल्हा मराठा पतसंस्थेचे संचालक काशिनाथ डोंगरे, दैनिक युवावार्ताच्या संपादक सुशीला हासे यांच्यासह दैनिक युवावार्ता परिवारातील सदस्य उपस्थित होते.

# जि. प. च्या माजी सदस्य सौ. मीराताई चकोर यांचे निधन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -आर्किटेक्ट बि.आर.चकोर यांच्या पत्नी व जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या माजी सभापती सौ. मीराताई भीमाशंकर चकोर यांचे दुःखद निधन झाले असून त्यांच्या निधनाने संगमनेर तालुक्यात मोठी शोककळा पसरली आहे.

मीराताई चकोर यांनी अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या समाज कल्याण विभागाच्या सभापती म्हणून अत्यंत प्रभावीपणे काम केले. जिल्हाभर काँग्रेस पक्षाच्या माध्यमातून त्यांनी महिलांचे संघटन मोठे केले. याचबरोबर तालुका पंचायत समितीच्या सदस्या म्हणूनही त्यांनी काम केले.

मागील काही दिवसांपासून त्या आजारी होत्या यानंतर काल गुरुवार दिनांक १८ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री ८.३० वा त्यांची प्राणजोत मालवली. मृत्यू समयी त्यांचे वय ५८ वर्ष होते. त्यांच्या पश्चात पती आर्किटेक्ट बि.आर.चकोर, मुलगी असा परिवार आहे. स्वर्गीय हरिभाऊ सांगळे यांच्या त्या कन्या त्यांच्याकडूनच राजकीय व सामाजिक वारसा त्यांना मिळाला होता. त्यांच्यावर पिंपळे येथे अंत्यसंस्कार करण्यात आले आहे. त्यांच्या निधनाबद्दल काँग्रेस पक्षाचे नेते माजी मंत्री बाळासाहेब थोरात, मा. आ. डॉ. सुधीर तांबे, आ.सत्यजित तांबे, डॉ. जयश्रीताई थोरात, रणजीतसिंह देशमुख, पांडुरंग पाटील घुले, सौ.दुर्गाताई तांबे, तालुकाध्यक्ष अजय फटांगरे, काँग्रेसचे जिल्हा उपाध्यक्ष सुभाष सांगळे, गणपतराव सांगळे, ड ज्ञानेश्वर सांगळे, सौ. अर्चनाताई बालोडे यांच्यासह निमोण व नान्नज दुमाला परिसरात विविध गावांमधून नागरिक व पदाधिकाऱ्यांनी शोक व्यक्त केला आहे. दैनिक युवावार्ता परिवाराच्यावतीने त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

# छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या हस्ते सहयोग मल्टीस्टेटच्या सातारा शाखेचे उद्घाटन

युवावार्ता (प्रतिनिधी)

सातारा - सहयोग मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.च्या सातारा शाखेचा भव्य शुभारंभ ७ सप्टेंबर २०२६ रोजी उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला. छत्रपतींच्या शुभाशीर्वादाने संस्थेच्या विस्ताराच्या नव्या पर्वाला



सुरुवात झाल्याचे यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

सातारा शाखेचे उद्घाटन श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आले. त्यांच्या उपस्थितीने आणि लाभलेल्या शुभाशीर्वादाने संस्थेला मोठी प्रेरणा मिळाली असून, ही बाब संस्थेसाठी अभिमानाची असल्याचे संस्थापक चेअरमन दिगंबरजी टेकाळे यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे संचालक अतुल गलधर, ज्ञानेश्वर दिलवाले, अनिल मंडलिक तसेच सातारा शाखाप्रमुख ऋषिकेश भोसले यांनी उपस्थित मान्यवर, अतिथी व शुभेच्छुकांचे स्वागत करून सत्कार केला. कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्वांचे त्यांनी आभार मानले.

सहयोग मल्टीस्टेट को-ऑप क्रेडिट सोसायटी लि.ने आपल्या कार्याचा विस्तार करत पाच जिल्ह्यांत एकूण १५ शाखांचा टप्पा पूर्ण केला आहे. संस्थेच्या माध्यमातून अधिकाधिक सभासद व ग्राहकांपर्यंत आर्थिक सेवा पोहोचविण्याच्या उद्देशाने शाखाविस्ताराला गती देण्यात येत आहे. मार्च २०२७ पर्यंत संस्थेच्या २५ शाखा पूर्ण करण्याचा विश्वास संस्थापक चेअरमन दिगंबरजी टेकाळे यांनी व्यक्त केला.

सातारा शाखेच्या शुभारंभामुळे संस्थेच्या विस्तारात आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला असून, ग्राहकांना आधुनिक व विश्वासार्ह आर्थिक सेवा उपलब्ध करून देण्याच्या दिशेने संस्थेची वाटचाल सुरू असल्याचे यावेळी स्पष्ट करण्यात आले.

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

# मी थांबणार नाही, सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणारच - संतोष पंडीत

पुणे (वृत्तसंस्था)- विनयभंग प्रकरणात पुणे न्यायालयाने जामीन मंजूर केल्यानंतर संतोष पंडित यांची काल येरवडा कारागृहातून सुटका झाली. कारागृहातून बाहेर पडल्यानंतर पत्रकारांशी बोलताना पंडित म्हणाले, घडलेला प्रकार हा एक मोठा धक्का होता. सध्या हे प्रकरण न्यायप्रविष्ट असून माझा न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे. मी जे काही करत आहे, तो माझा घटनात्मक अधिकार आहे. हा अधिकार मी आधीही बजावत होतो आणि पुढेही बजावत राहीन. संतोष पंडित म्हणाले की, मी थांबणार नाही. लोकशाहीत जनता हीच देशाची खरी मालक आहे, त्यामुळे जनतेने प्रश्न विचारलेच पाहिजेत. मी कोणावरही वैयक्तिक टीका केलेली नाही. आपण ज्यांना निवडून देतो आणि जे लोक सत्तेत आहेत, त्यांना कोणताही प्रश्न असो, सत्ताधारी म्हणून विचारलाच पाहिजे. आरोपीला तपासासाठी अधिक काळ कोठडीत ठेवण्याची आवश्यकता नाही, असे स्पष्ट करत न्यायालयाने जामीन मंजूर केला. सरकारी पक्षाने मांडलेले मुद्दे केवळ काल्पनिक असून जामीन नाकारण्यासाठी ते पुरेसे नाहीत, असे निरीक्षणही न्यायालयाने नोंदवले. जामिनावर सुटका करताना संतोष पंडित यांनी तक्रारदाराशी प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष संपर्क साधू नये, तसेच पुराव्यांशी कोणतीही छेडछाड करू नये, अशा कडक अटी न्यायालयाने घातल्या आहेत.




सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
* कर्ज रक्कम वाढ । * कर्ज व्याजदर कमी । * कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु॥, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल

24 HRS EMERGENCY SERVICES
Health Emergencies Don't Wait.
Neither DO WE
24 तास सुविधांसाठी
02425 - 224761
मोबा. 7038170382
डॉ. जठार हॉस्पिटल
ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर

कुटे हॉस्पिटल
अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
- सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
- अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
- अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
संपर्क क्रमांक - 8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर – ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25